cmyk

## संपादकीय

### यंत्रणेची असंवेदनशीलता

विविध आंदोलने, मोर्चे आणि विविध मागण्यांसाठी रस्त्यावर उतरून सामान्य माणसांना वेठीस धरणे आता सामान्य बाब बनली आहे. लोकशाहीतील लोकांचे महत्त्व पुरते अर्थहीन ठरत आहे. लोकशाहीचे लोकच खरे आधारस्तंभ. तेच लोकशाही सार्थ ठरवतात, अशी वाये वेळप्रसंगी लोकांच्या तोंडावर फेकून मारली जात असली तरी सामान्य लोकच आता बिच्चारे बनत आहेत.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com    नवी दिशा... नवे विचार.....    email:rajyaloktantra75@gmail.com

● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१९३ | सोमवार दि. १० नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### महाराष्ट्रात थंडीची लाट येणार

मुंबईः यंदा पावसाने अगदी ऑक्टोबरच्या शेवटपर्यंत हजेरी लावलेली असताना आता महाराष्ट्रामध्ये थंडीची चाहूल लागली आहे. थंडी हळूहळू महाराष्ट्रात दाखल होत असून, पुढील काही दिवसांत राज्यात गारठ्याचे साम्राज्य पसरणार आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील काही दिवस तापमानात चढ–उतार होणार आहेत. म्हणजे सकाळ–संध्याकाळ थंडी आणि दुपारी थोडी ऊबदार हवा, असे हवामान अनुभवता येणार आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार राज्यात सध्या कोरड्या हवेचा प्रभाव असून, त्यामुळे आकाश मुख्यत: स्वच्छ राहील. पण सकाळ–संध्याकाळ थंडी वाढेल. विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्र या भागात किमान तापमान १२ ते १५ डिग्री सेल्सिअसपर्यंत खाली जाणार आहे.

### परिक्षेला बसू न दिल्याने विद्यार्थ्याने घेतले जाळून

दिल्लीः उत्तर प्रदेशातील बुढाणा येथील डीएव्ही पीजी पदवी महाविद्यालयात एक अत्यंत मन हेलावून टाकणारी घटना घडली आहे. केवळ ७ हजार रुपये परीक्षा शुल्क न भरल्याने २४ वर्षीय विद्यार्थी उज्ज्वल राणा याला परीक्षेला बसण्यास सक्तीने मनाई करण्यात आली. या घटनेमुळे व्यथित आणि संतप्त झालेल्या या विद्यार्थ्याने अखेर महाविद्यालयाच्या आवारातच स्वतःला पेटवून घेतले. या गंभीर कृतीपूर्वी, त्याने महाविद्यालयाचे प्राचार्य आपल्यावर सातत्याने छळ आणि अपमान करत असल्याचा गंभीर आरोप केला. या घटनेने संपूर्ण कॅम्पसमध्ये तणाव निर्माण झाला असून, संतप्त विद्यार्थ्यांनी तात्काळ मोठे आंदोलन सुरू केले आहे. याची गंभीर दखल घेत पोलिसांनी प्राचार्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, प्रकरणाचा सखोल तपास सुरू करण्यात आला आहे.

### सांस्कृतिक मूल्यांमुळेच देशात सशक्त लोकशाही

पुणेः आपल्या शेजारी देशांमध्ये लोकशाही टिकू शकली नाही. मात्र, भारतात ती अधिक चांगल्या प्रकारे रूजली, कारण आमची मूळ संस्कृतीच लोकशाही आणि सहिष्णूतेच्या मूल्यांवर आधारित आहे. तीच मूल्ये आमच्या संविधानात समाविष्ट असल्याने आम्हाला मजबूत असे संविधान मिळाले आहे. यामुळेच आमचा देश प्रगती करतोय आणि लोकशाही देखील सशक्त होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. संस्कार भारतीच्या अ.भा. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या उद्घाटन सत्राचे प्रमुख अतिथी म्हणून मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

### जपानला भूकंपाचा धक्का.! त्सुनामी लाटांचा इशारा

टोकियोः जपानच्या उत्तरेकडील भागाला आज भूकंपाचा जोरदार धक्का जाणवला. एकापाठोपाठ अनेक धक्के जाणवल्याचे जपानच्या भूगर्भशास्त्र केंद्राने म्हटले आहे. भूकंपाच्या धक्क्यामुळे त्सुनामी लाटा उसळण्याचा इशाराही देण्यात आला आहे. या भूकंपाची तीव्रता ६.७ मॅग्निट्युड इतकी होती. भूकंपाचा केंद्रबिंदू समुद्राखाली १० किलोमीटरवर होता. या भूकंपामुळे कोणीही जखमी झाल्याचे वृत्त नाही. तसेच भूकंपामुळे या परिसरात असलेल्या दोन अणूभट्ट्यांचे कोणतेही नुकसान झाल्याचेही वृत्त नाही. भूगर्भशास्त्रीय केंद्रानेएक मीटर उंचीच्या त्सुनामी लाटा उसळण्याचा इशारा दिला गेला.

### भारतात दहशतवादी हल्ल्याचा कट उधळला

गांधीनगरः गुजरात एटीएसला मोठे यश मिळाले असून एटीएसने ३ संशयित दहशतवाद्यांना अटक केली आहे. मागील १ वर्षापासून ते गुजरात एटीएसच्या रडारवर होते. या तिघांना शस्त्र पुरवठा करताना अटक करण्यात आली आहे. हे संशयित दहशतवादी देशाच्या विविध भागात हल्ला करण्याचा कट रचत होते. मात्र एटीएसने केलेल्या कारवाईमुळे दहशतवाद्यांचा हा कट उधळला आहे. गुजरात एटीएसने अटक केलेले तिन्ही संशयित मूळचे हैदराबादचे असल्याचे बोलले जाते. हे ३ संशयित दहशतवाद्यांच्या नव्या मॉड्यूलशी जोडले होते. गुजरातमध्ये अडालज येथे या तिघांना अटक करण्यात आली.

# रब्बी पीकविमा नोंदनीला मुदतवाढ

## तीन जिल्ह्यांना विशेष सवलत, लाभ घेण्याचे कृषी विभागाचे आवाहन

पुणे । प्रतिनिधी

**यंदाच्या रब्बी हंगामातील पीकविमा योजनेत नोंदणीसाठी राष्ट्रीय पीक विमा पोर्टल सुरू करण्यात आले असून, ज्वारी पिकासाठी ३० नोव्हेंबर, गहू, हरभरा व कांदा पिकासाठी १५ डिसेंबर व उन्हाळी भुईमूगासाठी ३१ मार्च २०२६ अशी मुदत ठेवण्यात आली आहे. या मुदतीत योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.**




पुणे, सोलापूर व अहिल्यानगर या तीन जिल्ह्यांत भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत ही योजना राबविण्यात येत आहे. योजनेत सहभागी होण्यासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी–फार्मर आयडी, आधार कार्ड, बँक खाते तपशील, जमीन धारणा उतारा, भाडेपट्टीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना नोंदणीकृत भाडेकरार आदी कागदपत्रे आवश्यक असून, ई–पीक पाहणी असणे बंधनकारक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. गव्हासाठी अहिल्यानगर जिल्हा (बागायत) विमा संरक्षित रक्कम ४५ हजार रूपये (विमा हप्ता ४५० रुपये), रब्बी ज्वारी बागायत व जिरायत, हरभरा–३६ हजार रुपये (३६० रुपये), पुणे जिल्हा गहू (बागायत) ४५ हजार रुपये (२२५ रुपये), रब्बी ज्वारी बागायत व जिरायत ३६ हजार रुपये (१८० रुपये), हरभरा– ३६ हजार रुपये (९० रुपये) याप्रमाणे विमा संरक्षित रक्कम व विमा ▶▶ पान २ वर

## महायुती एकत्रित लढावे अशीच इच्छा–अजित पवार

बारामती । प्रतिनिधी

**राज्यात २८८ नगरपरिषदा–नगरपंचायतीच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत. महायुती म्हणून आम्ही एकत्रित जनतेपुढे जावे अशी आमची इच्छा आहे, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.**



बारामतीत पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, निवडणूका एकत्रित लढण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राष्ट्रवादीकडून सुनील तटकरे, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, शिवसेनेचे उदय सामंत आदी लोक एकत्रित बसतील, चर्चा करतील. सगळ्यांनी एकत्रित लोकांपुढे गेले पाहिजे असे आमचे मत आहे. पण आघाडी सरकार असताना आम्ही स्वतंत्र लढत होतो. स्वतंत्र लढल्यावर मताची विभागणी होते. फायदा होणार असेल तर एकत्रितपणे लढले पाहिजे. आता निवडणुकीच्या निमित्ताने प्रत्येक पक्ष आपापली तयारी करत आहे. जेथे ज्या पक्षाची ताकद अधिक असेल त्यांनी इतर मित्रपक्षांना सन्मानपूर्वक जागा दिल्या तर फारसा प्रश्न उरत नाही, असे सांगून पवार म्हणाले, प्रत्येकाला आपली ताकद आजमावण्याचा अधिकार आहे, असे ते म्हणाले. माजी मंत्री तानाजी सावंत यांनी राष्ट्रवादीवर केलेल्या टिकेवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पलटवार केला. या प्रश्नावर ते म्हणाले, ▶▶ पान २ वर

## स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीत मूळ ओबीसी उमेदवारांनाच संधी

### शरद पवारांचा मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी


**राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आगामी स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत रविवारी एक मोठा निर्णय घेतला. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असोत किंवा विधानसभेच्या, पक्षाकडून मूळ ओबीसी उमेदवारांनाच संधी दिली जाणार आहे.**

ओबीसी आरक्षण व त्या संदर्भातील कुणबी प्रमाणपत्राच्या मुद्द्यावरून राज्यात



सुरू असलेल्या चर्चांच्या पार्श्वभूमीवर पवारांनी हा मोठा निर्णय घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मूळ ओबीसी असलेल्या उमेदवारांनाच संधी द्या, अशी स्पष्ट सूचना शरद पवारांनी पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत पदाधिकारी, आमदार, खासदारांना दिली. मात्र ज्या ठिकाणी मूळ ओबीसी उमेदवार मिळणार नाही, केवळ त्याच ठिकाणी पर्यायी कुणबी प्रमाणपत्र मिळालेल्या इच्छुकाला संधी द्या, असेही त्यांनी स्पष्ट केले ▶▶ पान २ वर

## मातोश्रीवर ड्रोनद्वारे नजर?



मुंबई । प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मातोश्री परिसरात ड्रोनद्वारे नजर ठेवण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आल्याने खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात विविध चर्चा रंगु लागल्या आहेत.मातोश्री बंगल्याच्या बाहेर जी जागा संवेदनशील म्हणून आहे, अशा ठिकाणी असा प्रकार घडल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. पण हे ड्रोन नेमके येथे काय करत होते याबाबत मुंबई पोलिसांनी ▶▶ पान २ वर

## मतय डॉ.संपदा वरील दबावाची देखील चौकशी व्हावी–आंबेडकर

### आरोपींना जोपर्यंत शिक्षा होत नाही तोपर्यंत आम्ही सोबत, डॉक्टरच्या कुटुंबियांची घेतली भेट

वडवणी प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर रविवारी वडवणी तालुक्यातील संबंधित डॉ.संपदा मुंडे यांच्या गावी त्यांच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी आले. आंबेडकर यांनी त्यांच्या भावना आणि मागण्या ऐकून घेतल्या. या वेळी बोलताना त्यांनी सांगितले की, ''या प्रकरणात डॉक्टरवर दबाव आणला जात होता आणि तो दबाव शवविच्छेदन अहवाल संदर्भात होता,'' असे स्पष्ट दिसत आहे. त्यामुळे एसआयटीने (विशेष तपास पथकाने) डॉक्टर यांच्या देखरेखीखाली झालेल्या शवविच्छेदनाची सखोल चौकशी करावी, असा त्यांनी आग्रह



धरला. यावेळी त्यांच्या सोबत पक्षाचे नवनाथ वाघमारेही उपस्थित होते. ▶▶ पान २ वर

## बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचार तोफा थंडावल्या

### उद्या शेवटच्या टप्प्यासाठी मतदान




पाटणा । वृत्तसंस्था

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी मागील काही दिवसांपासून धडाडणाऱ्या प्रचार तोफा रविवारी थंडावल्या. राज्यातील विधानसभेच्या जागांसाठी मंगळवारी मतदान होणार आहे. त्यापार्श्वभूमीवर प्रचाराच्या अंतिम दिवशी सत्ताधारी एनडीएसह प्रमुख विरोधी पक्ष राजद आणि काँग्रेसने कोणतीही कसर न सोडता प्रचार सभांचा धडाका लावला होता. बिहार विधानसभा निवडणुकीच्या ▶▶ पान २ वर

## विखे पाटलांची गाडी फोडणाऱ्याला एक लाखाचे बक्षीस–बच्चू कडू

अमरावती । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाचे नेते आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकरी कर्जमाफीबाबत वादग्रस्त विधान केले होते. आधी कर्जबाजारी होतात, नंतर कर्जमाफी मागतात, असे विखे–पाटील म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, आता 'प्रहार' संघटनेचे नेते माजी



राज्यमंत्री बच्चू कडू यांनी विखे–पाटलांची गाडी फोडणाऱ्याला १ लाखाचे बक्षीस जाहीर केले आहे. ▶▶ पान २ वर

## बीडच्या सुवर्णपदक विजेत्या सनीचे चंद्रकांतदादांनी स्वीकारलं पालकत्व !

पुणे । प्रतिनिधी

घरची परिस्थिती बिकट असूनही जिद्द, आणि कठोर परिश्रमाच्या बळावर बहारिनमधल्या आशियाई युवा कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई करणारा मुळचा बीडचा पण पुणे येथे राहणारा पैलवान सनी फुलमाळेचें आयुष्य त्या



कामगिरीने पालटले आहे. लोहगावमधील पालावर राहूनही कामगिरी करणाऱ्या सनी फुलमाळीचे ▶▶ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.८ नोव्हेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४१.०० क्विंटल | २,२०० | २,८५२ | २,५६० |
| ज्वारी/हायब्रिड :६८.५० क्विंटल | २,२०० | ३,४०० | २,८२८ |
| मका/लोकल: ५०.०० क्विंटल | १,९५० | १,९५० | १,९५० |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,००० | ६,००० |
| उडीद : १४.०० क्विंटल | ३,९०० | ५,०७० | ४,६५७ |
| बाजरी: ६९.५० क्विंटल | २,२८१ | २,८०० | २,६३९ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,२०० | ६,२०० | ६,२०० |
| सोयाबीन:२९४.०० क्विंटल | ३,६०० | ४,५२१ | ४,३७१ |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |

# देवाभाऊ काय झाले हो त्या डॉ.संपदा मुंडे प्रकरणाचे

बीड । प्रतिनिधी

**राज्याचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवा भाऊ हे क्लीन मुख्यमंत्री असल्याचा चेहरा राज्यात आहे. राज्यातील अनेक घटनांमध्ये त्यांनी न्याय मिळवून देण्याचे काम केले. मात्र एका ऊसतोड मजुराची मुलगी डॉक्टर संपदा मुंडे हिच्या आत्महत्ये प्रकरणात पोलीस उपनिरीक्षक बदने याच्या निलंबनाशिवाय काहीच केलेले दिसत नाही. हे प्रकरण ज्या पद्धतीने विरोधकांनी उचलले होते त्याची**



**तीव्रता कमी झाली, यावरून प्रत्येक ऊसतोड मजूर पालक विचारत आहे, देवा भाऊ काय झाले संपदाचे?**



एका ऊसतोड मजूर कुटुंबाने ऊस तोडून आपल्या मुलांना शिक्षित केले. बीड जिल्ह्यातील कवडगाव, तालुका वडवणी येथील कष्टकरी ऊसतोड मजुराने आपल्या मुलीला डॉक्टर बनवले. तीच डॉक्टर संपदा मुंडे फलटण ▶▶ पान २ वर

### पार्थ पवार अन जरांगे पाटील प्रकरण

फलटणमध्ये ज्या डॉक्टर संपदा मुंडे यांची आत्महत्या शासन आणि प्रशासकीय कट कारस्थानाचा बळी ठरली हे प्रकरण राज्यभर गाजत असताना तिला न्याय मिळेल आणि यातील खरे आरोपी गजाआड केले जातील अशी अपेक्षा असताना, राज्यात दोन घटना नव्या घडल्या. त्या म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांचा कोट्यावधीचा जमीन घोटाळा आणि त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांच्या हत्येचा कट. या दोन्ही घटनेमुळे राज्यातील जनतेचे लक्ष संपदा मुंडे प्रकरणावरून हटले गेले.

cmyk

## अग्रलेख

# यंत्रणेची असंवेदनशीलता

विविध आंदोलने, मोर्चे आणि विविध मागण्यांसाठी रस्त्यावर उतरून सामान्य माणसांना वेठीस धरणे आता सामान्य बाब बनली आहे. लोकशाहीतील लोकांचे महत्त्व पुरते अर्थहीन ठरत आहे. लोकशाहीचे लोकच खरे आधारस्तंभ. तेच लोकशाही सार्थ ठरवतात, अशी वाये वेळप्रसंगी लोकांच्या तोंडावर फेकून मारली जात असली तरी सामान्य लोकच आता बिचारे बनत आहेत. राजकारणी, पुढारी, तथाकथित राजकीय कार्यकर्ते, गाड्या-रस्ते जाम करणारी आंदोलने आणि प्रशासकीय कामकजाची गती यामुळे जनतेची अवस्था 'मुकी बिचारी कुणीही हाका' अशीच झाली आहे. महिनोन्महिने आंदोलने सुरूच राहतात. रस्ते अडवले जातात. कळत-नकळत लोकच वेठीला धरले जातात.

यातील गंभीरता वाढत गेली तेव्हा अनेकदा न्यायसंस्थेने हस्तक्षेप करत रस्ते मोकळे करण्याचे आदेश दिले. तथापि अशी वेळ जेव्हा जेव्हा येते तेव्हा सामान्य लोकच त्यात जास्त भरडले जातात. असे लोक आंदोलकांविषयी नकारात्मक मते समाज माध्यमांवर व्यक्त करताना आढळतात. तथापि कोणावरही रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची वेळ का येते? अन्याय झाल्याची भावना कधी निर्माण होते? सनदशीर मार्गाने दाद मागितली तर न्याय मिळत नाही अशी लोकभावना का बळावते? याची पाळेमुळे प्रशासकीय यंत्रणेत रुजलेली आढळतात. जनसामान्यांच्या समस्यांबाबत, त्यांच्या तक्रारींबाबत यंत्रणेत असंवेदनशीलता त्यांच्या अनुभवास येते. फलटण डॉटर आत्महत्या प्रकरण त्याचे चपखल उदाहरण ठरू शकेल. पीडित डॉटरने अनेक वेळा तिच्यावरील अन्यायाविरुद्ध प्रशासकीय यंत्रणेकडे दाद मागितली होती, असे तिच्या भावाने माध्यमांना सांगितले. यंत्रणेने ते नाकारल्याचे आढळले नाही. अनेकदा लोक त्यांच्यावर झालेल्या अन्यायाबाबत, विविध मागण्यांबाबत प्राथमिक टप्प्यात यंत्रणेकडे दाद मागतात. त्याची दखल तातडीने घेतली जाते का? मागण्यांची व्यवहार्यता तपासणे, तक्रारींमधील तथ्यता तपासणे आणि ते सामान्य माणसांपर्यंत पोहोचवणे हे यंत्रणेचे काम आहे. तथापि अनेकदा मूळ मुद्दा सोडवण्यापेक्षा रस्ता बदलून त्यावर तात्पुरता मार्ग काढला जातो. याची उदाहरणे अवतीभवती आढळतात.


न्यायाला होणारा विलंब अस्वस्थता आणि हतबलता निर्माण करू शकेल याची जाणीव अभावानेच आढळते. तात्पर्य, प्रशासकीय पातळीवरील दुर्लक्षामुळे रस्त्यावर उतरणे हा लोकांचाही नाईलाज ठरत असावा का? अन्याय झाल्याच्या आंदोलकांच्या तक्रारीत तथ्य असूही शकेल. ते नाकारले जाऊ शकत नाही. पण त्याची झळ सामान्य माणसांना विविध रूपाने बसू लागते त्याची जबाबदारी कोणाची, हा कळीचा मुद्दा ठरतो. रास्त कारणांसाठी असू शकेल कदाचित, पण अचानक जेव्हा रस्ते, महामार्ग, रेल्वेमार्ग अचानक किंवा ठरवून अडवले जातात तेव्हा सामान्य माणसांनी कुठे जावे? काय करावे? जाममधून कसा मार्ग काढावा? हे त्याची झळ बसलेल्या किती लोकांना ठाऊक असू शकेल? अचानक निर्माण झालेल्या परिस्थितीतून मार्ग काढण्याचा प्रयत्न लोक त्यांच्या परीने करतात तो जीवघेणा ठरू शकतो, हे मुंबई घटनेने अधोरेखित केले. माध्यमांत प्रसिद्ध झालेल्या वृत्ताप्रमाणे अचानक लोकल बंद झाल्याने गोंधळ निर्माण झाला. काही लोकांनी रेल्वेमार्गाने चालायला सुरुवात केली. अचानक बंद मागे घेतला गेला आणि लोकल सुरू झाल्या. त्या लोकांना लोकलची धडक बसली आणि दोन प्रवासी त्यात ठार झाले. त्यावरून वादविवाद सुरू आहे.

रस्त्यावर उतरल्याशिवाय ताकद सिद्ध होत नाही आणि यंत्रणेवर दबाव येत नाही हा भ्रम समाजात रुजण्याचे पाप राजकारणी नेत्यांच्या माथीदेखील मारले जाऊ शकेल. पक्षीय स्वार्थासाठी रस्ते जाम करण्याचा मार्ग तेच वारंवार अंमलात आणतात. तीच वृत्ती खालपर्यंत पाझरते. सामान्य माणसांनाही 'शासकीय काम आणि सहा महिने थांब' या वृत्तीचा अनुभव येतो. त्यांची किरकोळ कामेसुद्धा वेळेत होत नसल्याची तक्रार लोक नेहमीच करतात. किंबहुना, लोकांना शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवायला लावणे हेच यंत्रणेचे व्यवच्छेदक लक्षण बनले आहे. ऑनलाईनच्या जमान्यातदेखील हे चित्र फारसे बदललेले आढळत नाही. 'साहेब जागेवर नाहीत' या सबबीची जागा 'सर्व्हर डाऊन आहे' या सबबीने घेतली आहे. परीक्षा कोणतीही असो, त्याचा विद्यार्थ्यांवर ताण असतो. त्यादेखील सुरळीत पार पडत नाहीत. मागच्याच ठेच बसूनही पुढचा शहाणा होत नाही. मागच्या अनुभवांच्या आधारे सुधारणाही लोकांच्या अनुभवास येत नाहीत. अशी ही सगळी गुंतागुंत आहे ज्याच्या मुळाशी दुर्लक्ष केल्याची तीव्र भावना आहे. तेव्हा रस्त्यावरील अराजकाला यंत्रणेत मुरलेली असंवेदनशीलता किंवा 'ठंडा कर के खाओ' हा दृष्टिकोन मुख्यत्वे कारणीभूत मानला जायला हवा.

---

# तत्वनिष्ठ समाजवादी विचारवंत साथी एस.एम.जोशी

श्रीधर महादेव जोशी, अर्थातएस.एम. जोशी, (जन्म: १२ नोव्हेंबर १९०४; मृत्यु: १ एप्रिल १९८९) हेभारतीय स्वातंत्र्यसैनिक,समाजवादीकार्यकर्ते होते. ते प्रथम समाजवादी, नंतर प्रजासमाजवादी आणि शेवटी संयुक्त समाजवादी पक्षाचे सभासद होते. पत्रकारिता, लेखन, वक्तृत्व, राजकारण व समाजकारण या क्षेत्रांतील नि:स्वार्थीपणे अन्? अविरतपणे केलेल्या कार्यामुळे ज्यांचे आयुष्यच 'एक धडपडीचा इतिहास' बनून गेले असे ते समाजवादी लढवय्ये असून मवाळ वृत्तीचे एक नेते होते. एसएम जोशींचे महाविद्यालयीन शिक्षण पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजातून झाले.



भारत स्वातंत्र्य संग्रामात सहभागी होवुन अनेक वेळा कारावास भोगावा लागला भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक अग्रगण्य लढावु नेते म्हणून त्यांनी योगदान दिले.भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही स्वार्थाकडे दुर्लक्ष करून, देशार्थासाठी कार्यरत राहणे एसएम जोशींनी चालूच ठेवले. १९५७ साली ते महाराष्ट्र विधानसभेत आमदार झाले आणि १९६७ साली ते २ऱ्या लोकसभेसाठी खासदार म्हणून निवडून गेले. घरात दोन वेळच्या जेवणाची पंचाईत असताना आणि स्वत:चेच दु:ख डोंगराएवढे असतानाही देशहिताच्या गोष्टी करण्याची इच्छा त्यांना लहानपणापासूनच होती. जो दुबळा आहे त्याच्या बाजूने आपल्या तत्त्वांची ताकद उभा करणारा हा लढवय्या अगदी लहानपणापासून लोकहितदक्ष असे. देश स्वतंत्र व्हावा म्हणून आपापल्या परीने आणि मार्गाने प्रत्येक जण लढत होता. जहाल मवाळांच्या अखंड प्रयत्नातून आशेचा किरण सामान्यांच्या नजरेच्या टप्प्यात येत होता. हे प्रयत्न, राष्ट्रभक्तीचे वातावरण या सर्वांविषयी एस.एम. यांना विलक्षण ओढ होती. एसएम जोशी हे संयुक्त महाराष्ट्र समितीचे सक्रिय सभासद होते. संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेल्या चळवळीत आणि त्यानिमित्त झालेल्या प्रत्येक सार्वजनिक सभेत एस एम जोशी यांची हजेरी असे. महाराष्ट्र राज्य विधिमंडळाचे सदस्य म्हणून त्यांनी काम केले राज्यात समाजवादी विचारांचा प्रसार करून सामान्य माणसाला सक्षम करण्यासाठी प्रभावी प्रयत्न केले.त्यांच्या नेतृत्वाखाली फार मोठी समाजवादी विचारांची युवा पिढी निर्माण झाली असंख्य नेते कार्यकर्ते लोकसभा, विधानसभा, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या साथी, सहकारी नेतृत्वाची फळी तयार झाली. अश्या समाजवादी विचारवंत साथी एस एम जोशी यांचे दि१एप्रील१९८९ला निधन झाले.अशा थोर समाजवादी स्वातंत्र्यसेनानी,समाजसुधारक,विचारवंताला आज त्यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन...

**डॉ.राजेंद्र मुरलीधर सानप**
इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड, बीड
मो.नं.९४२००१९५९७

---

## प्रा.शिवाजीराव केंद्रे यांना सोमेश्वर साथी समाजरत्न पुरस्कार जाहीर

**बीड । प्रतिनिधी**



**येथील ज्येष्ठ साहित्यिक तथा सेवानिवृत्त प्राध्यापक शिवाजीराव केंद्रे यांना सोमेश्वर साथी समाजरत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. त्रिपुरा राज्याचे सार्वजनिक बांधकाम, कुटुंब कल्याण, आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, उद्योग, पर्यटन विभागाचे सचिव किरणकुमार गीते, विवेकानंद युथ वेल्फेअरच्या अध्यक्षा सौ. उषा किरणकुमार गीते, परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे, माजी सभापती भास्कर मामा चाटे, आधी मान्यवराच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण होणार आहे.**

प्रा शिवाजीराव केंद्रे हे बीड येथील सौ केशरबाई सोनाजीराव शिरसागर महाविद्यालयात भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून सेवनावृत्त झाले आहेत. प्रा. केंद्रे यांनी कथा, कविता, ललित, आदेश क्षेत्रात लेखन केले आहे. ज्येष्ठ साहित्यिक म्हणून ते सर्वत्र सुपरिचित आहेत. शनिवार दि.१५ नोहेंबर २०२५ रोजी शासकीय विशेष अतिथी विश्रामगृह, शिवाजी चौक, परळी येथे होणार आहे. सदर सदर कार्यक्रमास सहकुटुंब सहपरिवार उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्य संपादक बालासाहेब फड यांनी केले आहे.

---

# अन्यथा बीड नगरपालिकेत मोकाट कुत्रे व मोकाट जनावरे आणून सोडू-नवनाथ शिराळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर परिषदेला कर्तव्यदक्ष लाभलेले सी ओ साहेब आपण एकदा बीड शहरांमध्ये सर्वत्र फिरून चक्कर मारून या नंतर आपल्याला समजेल की नेमकं बीड शहरांमध्ये नेमकं चालले आहे तरी काय बीड शहरांमध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य नाल्या कोंडलेले आहेत व्यवस्थित नाहीत ठीक ठिकाणी पाईपलाईन फुटलेली आहे कुठे कुठे तर पाईपलाईन मध्ये मेलेले कुत्रे आढळतात हे मागच्या काही महिन्यापूर्वी दिसून आले आणि घाण कचरा देखील मोठे मोठे ढिगारे बीड शहरामध्ये ठीक ठिकाणी दिसून येत आहेत बीड नगर प्रशासनाला हे दिसत नाहीत का असा प्रश्न देखील आता बीड शहरातील नागरिकांना पडला आहे तसेच मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून तसेच मोकाट जनावर देखील बीड शहरातील विविध गल्लीबोळामध्ये आढळून येत आहेत आणि बीड शहरातील सर्वत्र प्रसिद्ध असलेले मार्केट भाजी मंडई या ठिकाणी देखील मोकाट कुत्रे



भरपूर लोकांना त्या ठिकाणी आढळतात व त्या ठिकाणी संस्कार महाविद्यालय शाळा असल्यामुळे त्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांना देखील या मोकाट कुत्र्यांचा त्रास सहन करावा लागत आहे डायरेक्ट माणसाच्या अंगावर चावा घेण्यासाठी कुत्रे धावून जातात असे अनेक ठिकाणी बीड शहरातील गल्ल्यामध्ये बोळीमध्ये मोकाट जनावर मोकाट कुत्रे दिसून येत आहेत म्हणून सी ओ साहेब आपण लवकरात लवकर यांचा बंदोबस्त करा त्यांच्यासाठी कोंडवाडा जो बंद पडलेला आहे तो तात्काळ चालू करा आणि त्या कोंडवाड्यामध्ये नेऊन हे मोकाट कुत्रे आणि मोकाट जनावरे घाला आणि त्यांची व्यवस्था त्या ठिकाणी नगर प्रशासनाच्या वतीने करा अन्यथा बीड नगरपालिकेमध्ये बीड शहरातील सर्व मोकाट कुत्रे व मोकाट जनावरे आणून आम्ही सोडू असा खणखणीत इशारा देखील भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून बीड नगर परिषदेला इशारा दिला आहे आता या वर बीड नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सी ओ साहेब कशाप्रकारे दखल घेतात आणि कशाप्रकारे बीड शहरातील मोकाट कुत्र्यांचा व जनावरांचा सुळसुळाट थांबवतात हे पाहणे देखील येणाऱ्या भविष्य काळामध्ये गरजेचे असल्याचे बीड शहरातील सर्व नागरिकांमधून बोलले जात आहे.

---

# स्वामीजी जोशी महाराज यांच्या हस्ते हा श्री भावार्थरामायण कथा शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र लिंबागणेश च्या जवळील असलेली श्रीक्षेत्र महाजन वाडी या ठिकाणी फिरता नारळी श्री संत एकनाथ महाराज कृतार्थ भावार्थरामायण कथेचा शुभारंभ मोठ्या उत्साहामध्ये आणि भक्तिमय आनंदमय वातावरणामध्ये श्री वेदशास्त्र संपन्न श्री हरिभक्त परायण श्री हिंदू धर्मभूषण श्री धर्माचार्य श्री अमृत आश्रम जी स्वामीजी महाराज धर्माचार्य यांच्या शुभहस्ते आज रोजी म्हणजेच दिनांक ६. ११ २०२५ रोजी गुरुवारी सायंकाळी साडेसात वाजता प्रदोष कालीन शुभ मुहूर्तावर मोठ्या उत्साहात या कथा शुभारंभाची सुरुवात झाली या वेळी येथे प्रमुख अतिथी म्हणून व श्री ईश्वर भक्त म्हणून उपस्थित असलेले देव देश धर्म यासाठी सातत्याने कार्यरत असलेले व सर्वांच्या सुखदु:खामध्ये सातत्याने सहभागी होणारे असे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली हा कथा शुभारंभ संपन्न झाल्यानंतर श्री धर्मगुरू श्री धर्माचार्य श्री अमृता आश्रम स्वामीजी जी महाराज यांनी अतिशय आनंद व्यक्त करत आपल्या आशीर्वाचनांमध्ये सांगितले की देव देश धर्म या साठी सातत्याने लोकांच्या सेवेमध्ये स्वतःला झोकुन घेणारे असे नेते मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील हे बीड जिल्ह्यामध्ये आहेत या बाबीचा मला फार आनंद वाटतो श्री नवनाथ अण्णांचे कार्य हे अतिशय उत्कृष्ट आहे मी करावे तेवढे त्यांच्या उत्कृष्ट धार्मिक व सामाजिक कार्याचे कौतुक कमीच आहे म्हणून मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांना उदंड आयुष्य लाभावे अशी मी श्री ईश्वरचरणी प्रार्थना करतो आणि त्यांच्या हातून असेच देव देश धर्म या साठी सातत्याने कार्य भविष्यात होत रावे अशी सदिच्छा व्यक्त करतो असे श्री धर्माचार्य श्री धर्मगुरू श्री अमृताश्रम जी स्वामी महाराजांनी आपल्या आशीर्वचन पर मा नवनाथ अण्णांच्या बाबतीत मनोगत व्यक्त करताना सांगितले नंतर हिंदू धर्मभूषण धर्माचार्य श्री अमृत आश्रम जी स्वामी जी जोशी नवगण राजुरी कर महाराजांचा सर्व गावकऱ्यांच्या वतीने मोठा आनंदाच्या वातावरणामध्ये श्री हनुमान मंदिरामध्ये सर्वत्र दिव्य दीप प्रज्वलित करून मोठा भव्य दिव्य असा श्री मंगलमय सत्कार संपन्न झाला तसेच मा श्री नवनाथ जी अण्णा शिरोळे पाटील यांचा देखील गावकऱ्यांच्या वतीने शाल व श्री फळ देऊन सत्कार संपन्न झाला तसेच या ठिकाणी सर्व उपस्थित असणाऱ्या श्री हरिभक्त परायण महाराज यांचा देखील शाल श्रीफळ



देऊन येथे सन्मान व सत्कार करण्यात आला यावेळी मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांनी सत्कार स्वीकारल्यानंतर श्री हिंदू धर्मभूषण धर्माचार्य व बीड जिल्ह्याचे व श्रीक्षेत्र नवगण राजुरी चे सर्वत्र भारत देशामध्ये धार्मिक कार्याचे बाबतीत नाव लौकिक केलेले असे बीड जिल्ह्याचे वैभव असलेले परमपूज्य श्री प्रातःस्मरणीय धर्माचार्य श्री अमृत आश्रम स्वामीजी महाराज हे धार्मिक क्षेत्रामध्ये करत असलेल्या उत्कृष्ट अप्रतिम श्री हिंदू धर्मप्रचाराच्या कार्याच्या बाबतीत मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील हे बोलताना पुढे म्हणाले की भारतभर देव देश धर्मासाठी उत्कृष्ट धार्मिक कार्य करणारे असे व श्री

धार्मिक क्षेत्रामध्ये सर्वात मोठे उच्च पदस्थ असलेले श्री धर्माचार्य श्री अमृत आश्रम जी स्वामीजी महाराज यांची भेट होणे देखील दुर्लभ असते शक्य नसते परंतु आज फार मोठा महा योग आहे की आज आपल्याला श्री धर्मगुरू श्री धर्माचार्य श्री अमृता आश्रम स्वामीजी महाराज यांची भेट झाली आणि त्यांचे दर्शन झाले हे आपले सर्वांचे परम भाग्य आहे आणि भविष्यात बीड शहरातील सर्वांच्या नवसाला पावणारे असे बार्शी रोडवरील श्रीक्षेत्र सोमेश्वर महादेवाचे मंदिर आहे या मंदिरामध्ये महाराजांनी येऊन या ठिकाणी सोमेश्वर मंदिरामध्ये आपले कायमस्वरूपी निवासस्थान ठेवून आम्हाला त्यांची सेवा करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी व तसेच आम्हाला वेळोवेळी या ठिकाणी श्री सोमेश्वर मंदिरामध्ये धार्मिक कार्यासाठी आम्हाला उत्कृष्ट अप्रतिम मार्गदर्शन करावे असी मी विनंती देखील सर्व मंदिर विश्वस्तांच्या वतीने मी परमपूज्य प्रातःस्मरणीय श्री धर्माचार्य श्री अमृत आश्रम स्वामी जी धर्माचार्य महाराजांना या भेटीदरम्यान मी विनंती केली आहे महाराजांनी देखील आपण नक्कीच श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिर या ठिकाणी येऊ असे आश्वासन दिले आणि श्रीक्षेत्र सोमेश्वर मंदिरामध्ये होणाऱ्या सर्व धार्मिक कार्यक्रमासाठी आपण चांगल्या प्रकारे देव देश धर्म उत्कृष्ट धार्मिक कार्यासाठी कसे उत्कृष्ट धार्मिक कार्य भविष्यामध्ये मंदिर विश्वस्तांच्या वतीने करता येईल या साठी आपण नक्कीच सर्व गुणीजनांना सद भाविक भक्तांना हेथोचित आपण या मंदिरामध्ये येऊन मार्गदर्शन करणार असल्याचेही परमपूज्य श्री अमृत आश्रम स्वामी जी महाराजांनी सांगितले यावेळी येथे उपस्थित असलेले महाजन वाडीतील सरपंच तसेच ग्रामपंचायत सर्व सदस्य गावकरी सर्व लहान थोर भक्तमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी येथे उपस्थित असलेले बाबुरावजी परळकर साहेब माजी नगरसेवक बीड तसेच पत्रकार संजय देवा कुलकर्णी कुक्कडगावकर सह मान्यवर आदी सह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## पान १ वरून...

### रब्बी पीकविमा नोंदनीला

हप्ता राहणार आहे. तर सोलापूर जिल्हा - गहू (बागायत) विमा संरक्षित रक्कम ३८ हजार रुपये (विमा हप्ता ३८० रुपये), रब्बी ज्वारी बागायत ३६ हजार रुपये (३६० रुपये), रब्बी ज्वारी ३० हजार (३०० रूपये). शेतकऱ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

-------------

### स्थानिक स्वराज संस्था

आहे. दरम्यान, शरद पवारांनी पुन्हा एकदा भाजप सोबत कोणत्याही परिस्थितीत युती करू नये, याचा पुनरुच्चार केला. पक्षाने महाविकास आघाडीसोबत राहून आगामी निवडणुका लढवाव्या, यावरही त्यांनी भर दिल्याचे समजते.

------------

### महायुती एकत्रित लढावे

विनाशकाले विपरित बुद्धी. आम्हाला यावर काही बोलायचे नाही. आम्ही सुसंस्कृत महाराष्ट्रात राजकारण करतो. दुसऱ्यांनी वेडेपणा केला, बेजबाबदार आरोप केला म्हणून उत्तरे देत बसत नाही. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेतकरी कर्जमाफीबद्दल केलेल्या वक्तव्याबाबत पवार यांना विचारले असता ते म्हणाले, मी त्यांच्याकडून माहिती घेईल. ते आणि मी दोघे शेतकरी आहोत. याबद्दल त्यांच्याशी मी चर्चा करेन. दरम्यान, मुंबईत ठाकरे यांचे निवासस्थान असलेल्या मातोश्री परिसरात ड्रोनद्वारे टेहळणी केली जात असल्याचा आरोपावर ते म्हणाले, याबाबत मला काही माहिती नाही. पोलिस खात्याचा हा विषय आहे. पण मी कोणावर नजर ठेवलेली नाही.

-----------

### बिहार विधानसभा निवडणुकीच्या

अंतिम टप्प्यातील मतदानाला अवघे काही तास शिल्लक आहेत. तत्पूर्वी रविवारी संध्याकाळी प्रचार तोफा थंडावल्या. अखेरच्या दिवशी निवडणूक प्रचार शिगेला पोहोचला होता. एनडीएच्या उमेदवारांसाठी पंतप्रधान मोदींनी शनिवारी शेवटची सभा घेतली आणि आता शपथविधीला भेटूया, असे सांगितले. त्यांच्या पाठोपाठ रविवारी लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, खासदार प्रियंका गांधी यांच्यासह तेजस्वी यादव यांनी विरोधकांच्या प्रचारांच्या मोर्चा सांभाळला. दुसऱ्या टप्प्यात एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवेसी यांनीही आपल्या उमेदवारांसाठी पूर्ण ताकदीने प्रचार केला. बिहार निवडणुकीच्या दोन्ही टप्प्यामध्ये एनडीएच्या प्रचाराची धुरा पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री नितीश कुमार, यांच्यासह केंद्रीय मंत्री चिराग पासवान, लल्लन सिंह यांच्या खांद्यावर होती तर विरोधकांच्या वतीने महागठबंधनसाठी राहुल गांधी, प्रियंका गांधी, तेजस्वी यादव, मुकेश सहानी यांनी प्रचार केला. राजद खासदार आणि लालू प्रसाद यादव यांच्या कन्या डॉ. मिसा भारती यांनीही महागठबंधांच्या उमेदवारांसाठी राज्यभर प्रचार केला. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे प्रकृती अस्वास्थ्यामुळे बिहार निवडणूक प्रचारात जास्त सहभागी होऊ शकले नाही. दुसरीकडे असदुद्दीन ओवेसी, तेजप्रताप यादव, प्रशांत किशोर यांनी आपापल्या पक्षांच्या उमेदवारांसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले.

-------------

### मतय डॉ.संपदा वरील दबावाची

यावेळी प्रकाश आंबेडकर म्हणाले की. डॉक्टरवर दबाव कोणाकडून आणला गेला तो राजकीय होता का, पोलिसांकडून होता का, की सामाजिक दबाव होता हे समजणे गरजेचे आहे. ज्यांनी त्यावेळी डॉक्टरांना फोन केले, त्यांच्या कॉल रेकॉर्डची तपासणी व्हावी, असे आंबेडकर म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेवर टीका करत आंबेडकर म्हणाले, मुख्यमंत्री पोलिसांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर स्टेटमेंट देतात. परंतु नंतर त्या माहितीचा विपर्यास झाल्याचे दिसते. त्यामुळे चुकीची माहिती देणाऱ्या पोलिसांवर मुख्यमंत्र्यांनी कारवाई करावी. तसेच आंबेडकर यांनी शासनाला मागणी केली की, डॉक्टरच्या कुटुंबातील एका सदस्याला शासकीय नोकरी द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी त्यांनी सांगितले की, फलटण येथील ॲडव्होकेट मोरे, जे वंचित बहुजन आघाडीचे संस्थापक सदस्य आहेत, ते या प्रकरणात कुटुंबीयांना कायदेशीर मदत करतील. महिला आयोगाच्या अध्यक्षांनी केलेल्या वक्तव्यावरही आंबेडकरांनी नाराजी व्यक्त केली. अशा संवेदनशील प्रकरणावर जबाबदारीच्या पदावर असलेल्या व्यक्तींनी असंवेदनशील वक्तव्य करू नये, असे त्यांनी म्हटले. शेवटी आंबेडकर म्हणाले की, या घटनेमुळे बीड जिल्ह्यातील सामाजिक सलोखा बिघडला आहे. त्यामुळे राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेऊन सामाजिक सलोखा राखण्यासाठी ठोस पावले उचलावीत.

---------

### मातोश्रीवर ड्रोनद्वारे नजर?

महत्त्वाची माहिती दिली आहे. वांद्रे येथील मातोश्री बंगल्याशेजारील परिसरात एक अज्ञात ड्रोन घिरट्या घालताना आढळून आले. खरंतर या परिसरात कोणत्याही प्रकारचे ड्रोन किंवा हवाई साधन उडवण्यास बंदी आहे. अशातच ठाकरेंच्या सुरक्षेच्या दृष्टीने मातोश्री हा उच्च सुरक्षा झोन असल्याने हा प्रकार गांभीर्याने घेतला जात आहे. या प्रकारामुळे चर्चांना उधाण आले आहे. या ड्रोनबाबत मुंबई पोलिसांनी माहिती दिली आहे. एमएमआरडीएच्या परवानगीनेच हे ड्रोन उडवण्यात आल्याची माहिती मुंबई पोलिसांनी दिली. ड्रोनचे हवाई उड्डाणाचे कारणही पोलिसांनी सांगितले. एमएमआरडीएचे सर्वेक्षण सुरू होते. त्यामुळे हे ड्रोन उडवण्यात आले, असे मुंबई पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. ठाकरेसेनेचे नेते अंबादास दानवे यांनी एक्सवरून मातोश्री परिसरात ड्रोनचे हवाई उड्डाणाचा व्हीडीओ पोस्ट केला आहे. मातोश्रीवरील सुरक्षा रक्षकांच्या हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी याचा व्हीडीओ शूट केला. त्यामुळे मातोश्रीवरील सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाल्याचा दावा दानवे यांनी पोस्टमध्ये केला आहे.

-------------

### बीडच्या सुवर्णपदक विजेत्या सनीचे

पालकत्व राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी घेतले आहे. लोकसहभागातून घर आणि सरावासाठी तालीम, शिक्षणासाठी सर्वतोपरी मदत आणि स्वतःच्या पगारातून दरमहा ५० हजार देण्याची घोषणा चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. चंद्रकांत पाटील यांनी सुवर्णपदक विजेता पैलवान सनी फुलमाळी आणि त्याच्या कुटुंबाची लोहगावमधील पालावर जाऊन भेट घेतली. त्याच्या कामगिरीचे भरभरून कौतुक केले. यावेळी सनीचे प्रशिक्षक वस्ताद सदाशिव राखपसरे, भाजपा क्रीडा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संदीपआप्पा भोंडवे, माजी नगरसेवक बॉबी टिंगरे यांच्यासह भागातील नागरिक आणि पालावरील बांधव उपस्थित होते. सनीच्या कामगिरीचे कौतुक करताना चंद्रकांत पाटील म्हणाले की, जिद्द, चिकाटी आणि कठोर मेहनतीच्या बळावर सनीने मिळवलेले यश हे अतिशय कौतुकास्पद आहे. आज त्याने आपल्या कामगिरीने आई-वडिलांचे नाव काढले आहे. डोक्यावर छप्पर नसतानाही पालावर राहून त्याने ही कामगिरी केली आहे. आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या काळात यापूर्वीच झालेला आहे. पण हा निर्णय १७ वर्षांवरील खेळाडूंना लागू आहे. त्यामुळे सनीच्या निमित्ताने १७ वर्षांखालील खेळाडूंनाही प्रोत्साहन मिळावे, यासाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार असल्याचे चंद्रकांत पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले.

----------

### विखे पाटलांची गाडी फोडणाऱ्याला

नाव राधाकृष्ण आहे, मात्र कृत्ये कंसाची करायची असतील तर कंसाची ही अवलाद मुख्यत्र्यांनी हाकलून लावली पाहिजे, असा संताप बच्चू कडू यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री एकीकडे कर्जमाफीची घोषणा करतात, तर दुसरीकडे वाचाळवीर मंत्री अशी विधाने करतात. लोक मारत नाही याचे आभार माना आणि ही नायालकी थांबवा, असेही बच्चू कडू म्हणाले. यावेळी त्यांनी विखे पाटलांची गाडी फोडणाऱ्याला एक लाखाचे बक्षीस देण्याची घोषणा केली. तसेच मला जर त्यांची गाडी दिसली तर मीच फोडणार, असेही ते म्हणाले. कधी अतिवृष्टी, तर कधी दुष्काळ अशा संकटांनी होरपळलेल्या शेतकऱ्यांना राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी डिवचणारे वक्तव्य केले. पंढरपूर येथे एका सभेत भाषणादरम्यान विखे पाटील यांची जीभ घसरली. ते म्हणाले, सोसायटी काढायची, कर्ज काढायचे, पुन्हा कर्ज माफ करून घ्यायचे आणि पुन्हा कर्जमाफीची मागणी करायची. हे अनेक वर्षांपासून सुरू आहे. याची चिंता नाही. महायुती सरकार १०० टक्के शेतकऱ्यांचे कर्ज माफ करणार आहे, असे म्हणत विखे पाटील यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला.

----------

### देवाभाऊ काय झाले हो त्या

येथील रुग्णालयात कार्यरत असताना, तिला सरकारी व्यवस्थेचा बळी ठरावी लागले. ही मोठी शोकांतिका होती. सरकारी व्यवस्थेचा बळी म्हटल्यावर सरकार कोणाची बाजू घेणार हे स्पष्ट दिसत होते. या प्रकरणामध्ये संपदा आणि मृत्यूपूर्वी दिलेले जबाब, मृत्यूपूर्वीची नोट यावरून तिचा मानसिक आणि शारीरिक छळ तेथील व्यवस्थेने केला आहे. ज्या व्यक्तीकडे बोट दाखवले जाते ते देवा भाऊच्या पक्षातील माजी खासदार आहेत. त्यांना या घटनेनंतर देवा भाऊंनी क्लीन चीट दिली असली, तरी या प्रकरणातील खरे सूत्रधार पकडले गेले नाहीत. याउलट मयत संपदाच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवण्याचे काम महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर तसेच एका मंत्री असलेल्या व्यक्तीने केले. आपल्या महाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये एखाद्या मयत व्यक्तीबद्दल चांगले बोलले जाते मात्र इथे तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवले गेले, ही मोठी शोकांतिका म्हणावी लागेल. या घटनेचा तपास एसआयटी मार्फत करण्याची मागणी केल्यानंतर देवाभाऊने एका महिला आयपीएस अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली तपास होईल असे आदेश काढले. यावर विरोधकांनी आवाज उठवला. याच प्रकरणांमध्ये शिवसेनेच्या सुषमा अंधारे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे महबूब शेख, वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राज्याचे माजी मंत्री राष्ट्रवादी अजित पवार गटाचे नेते आमदार धनंजय मुंडे, मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह अनेक नेत्यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून आरोपींना शिक्षा करण्याची मागणी केली. हे प्रकरण केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देश पातळीवर पोहोचले गेले. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी देखील यात लक्ष घालून आरोपींना शासन करण्याची मागणी केली. मात्र हे प्रकरण माध्यमांमध्ये जोरात सुरू असताना, हे प्रकरण अचानक शांत कसे झाले. या प्रकरणाला जोडूनच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मुलाचा जमीन घोटाळा. त्यानंतर मनोज जरांगे यांच्या हत्येचा कट प्रकरण ही सर्व प्रकरणे बाहेर आली आणि ज्या संपदाला न्याय मिळावा आणि तो न्याय देवा भाऊ देतील अशी अपेक्षा जनता करत असताना त्यावर मात्र कोणीच बोलत नाही. मग आता जनताच विचारत आहे, देवा भाऊ काय झाले त्या डॉक्टर संपदा मुंडे प्रकरणाचे. संपदाच्या कुटुंबीयांना कधी न्याय मिळणार, याच अपेक्षेने देवा भाऊ कडे डोळे लावून आहेत.


----------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार दि. १० नोव्हेंबर २०२५
३

## थोडक्यात...

### प्रितीश खंडेलवालचे सीए परीक्षेत यश

बीड । प्रतिनिधी



इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्सच्या वतीने माहे सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत प्रितेश रवींद्र खंडेलवाल यांनी उज्वल यश संपादन केले आहे.सोमवार दि.३ नोव्हेंबर २०२५ रोजी सीए परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. अभ्यासातील कष्ट, मेहनत, अभ्यासातील सातत्य यामुळे प्रितेश'ने हे यश संपादन केले आहे. या सुयशाबद्दल प्रितेशचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदन होत आहे.

### संत सावता महाराजांच्या जीवनावर आधारित पुस्तकाचे बीड येथे प्रकाशन

पाटोदा । प्रतिनिधी

संत परंपरेचा संदेश,भक्तीचा आदर्श आणि समाज परिवर्तनाचा दीप प्रज्वलित करणारे संत शिरोमणी सावता महाराज यांचे जीवन हे प्रेरणादायी आदर्शाचे प्रतीक आहे. या महान संतांच्या कार्याचा आणि जीवन तत्त्वज्ञानाचा सखोल अभ्यास करून लेखक परमेश्वर बनकर यांनी त्यांच्या चरित्रावर आधारित एक मूल्यवान पुस्तक लिहिले आहे.या पुस्तकाचे प्रकाशन समारंभ रविवार, दि. १६ नोव्हेंबर रोजी बीड शहरातील हॉटेल गोल्डन चॉईस येथे सकाळी ११:३० वाजता आयोजित करण्यात आला आहे.या सोहळ्यात संत सावता महाराजांचे वंशज ह. भ. प. रविकांत महाराज वसेकर (अरण) यांच्या शुभहस्ते पुस्तकाचे प्रकाशन होणार असून, हा कार्यक्रम संत परंपरेतील एक ऐतिहासिक क्षण ठरणार आहे.

या प्रसंगी साहित्य, समाजसेवा आणि संत परंपरेशी निगडित अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमात संत परंपरेवर आधारित विचारमंथन, भक्तिगीते, तसेच लेखकास सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्याचा कार्यक्रमही होणार आहे.लेखक परमेश्वर बनकर यांनी या पुस्तकातून सावता महाराजांचे जीवन तत्त्वज्ञान, त्यांच्या कार्याची सामाजिक पार्श्वभूमी, भक्तीतील समतेचा संदेश आणि आजच्या पिढीसाठी असलेले त्यांचे मार्गदर्शन यांचे सुंदर चित्रण केले आहे. त्यांनी सांगितले की, ''संत सावता महाराज हे केवळ भक्त कवी नव्हते, तर समाजजागृतीचा दीप होते. त्यांच्या शिकवणीने आजच्या युवकांना आणि समाजाला दिशा देणारे कार्य व्हावे, हीच या पुस्तक लेखनामागची प्रेरणा आहे.''या प्रकाशनानिमित्ताने सर्व समाजबांधव, संतभक्त, साहित्यप्रेमी व वाचकवर्गाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन लेखक परमेश्वर बनकर यांनी केले आहे.

### दिव्यांग प्रवाशांना मेट्रो प्रवासात संपूर्ण सवलतीची मागणी-कैतके

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील एसटी महामंडळात महिला प्रवाशांना प्रवास भाड्यात ५० टक्के सवलत देण्यात आली आहे आणि उर्वरित ५० टक्के रक्कम शासनाकडून एसटी महामंडळाला परतावा स्वरूपात दिली जाते. या धर्तीवरच दिव्यांग प्रवाशांसाठीही मेट्रो प्रवासात अशाच प्रकारची सवलत द्यावी, अशी मागणी ज्येष्ठ पत्रकार आणि 'पत्रकार रुग्णमित्र' म्हणून ओळखले जाणारे दीपक कैतके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच मुंबई मेट्रो प्रशासनाकडे केली आहे. कैतके यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, मेट्रो स्थानकांमध्ये व गाड्यांमध्ये दिव्यांग अनुकूल सुविधा अद्याप पूर्णपणे उपलब्ध नाहीत. त्यामुळे अनेक दिव्यांग प्रवाशांना प्रवास करताना सहकारी व्यक्तीची मदत घ्यावी लागते. या अतिरिक्त अडचणींचा विचार करता, दिव्यांग बांधवांना मेट्रो प्रवासात संपूर्ण सवलत देणे हे केवळ सामाजिक न्यायाचे नव्हे, तर मानवी दायित्वाचे पाऊल ठरेल. त्यांनी पुढे नमूद केले आहे की, राज्य शासनाने महिला प्रवाशांसाठी केलेल्या निर्णयाप्रमाणेच दिव्यांग प्रवाशांसाठीही शासनाने परतावा स्वरूपात मेट्रो प्रशासनाला आर्थिक मदत देऊन ही सवलत शक्य आहे. दिव्यांगांना दिली जाणारी सवलत ही त्यांच्या शारीरिक मर्यादेची जाणीव ठेवून सन्मानपूर्वक दिलेली मदत ठरावी, अशी अपेक्षा कैतके यांनी व्यक्त केली आहे.



# सनी फुलमाळी याने बहरीनमध्ये आशियाई युवा स्पर्धेत ६० किलो गटात पटकावले सुवर्णपदक

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील पाटसरा येथील सनी फुलमाळीने बहरैनमध्ये झालेल्या आशियाई युवा कुस्ती स्पर्धेत ६० किलो गटात सुवर्णपदक पटकावत भारताचा झेंडा अभिमानाने फडकावला आहे. झोपडीत वाढलेला आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करत सनीने मिळवलेलं हे यश सर्वांसाठी प्रेरणादायी ठरलं असून बहरैनमध्ये आशियाई युवा स्पर्धेत ६० किलो गटात सुवर्णपदक पटकावत मोठे यश संपादन केले आहे.यशाबद्दल आष्टीमतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी अभिनंदन करत सनीचे कौतुक केले आहे.

सनीचा परिवार गेल्या १५ वर्षांपासून लोहगाव परिसरात वास्तव्यास आहे. वडील सुभाष फुलमाळी नंदीबैल घेऊन भविष्य सांगतात, तर आई सुई-दाभण विकून उदरनिर्वाह करतात.अशा परिस्थितीतही सनीने हार न मानता कुस्तीच्या माध्यमातून जीवन बदलवण्याचा निर्धार केला आणि आज तो देशाचा मान उंचावणारा सुवर्णपदक विजेता ठरला आहे.सनीचा कुस्तीप्रवास आजोबांच्या काळापासून सुरू झाला. वडिलांनाही कुस्तीची आवड होती, मात्र आर्थिक अडचणींमुळे ती थांबवावी लागली. तरीही माझी मुलं पैलवान व्हावीत ही त्यांची इच्छा कायम राहिली.



त्यांनी आपल्या तीन मुलांना भैय्या, बादल आणि सनी यांना स्वतः प्रशिक्षण दिलं. झोपडीजवळच्या माळरानावर तात्पुरती तालीम उभारून सुभाष फुलमाळी मुलांना सराव शिकवत असत.

> **अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून उभं राहून आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक मिळवणं ही मोठी कामगिरी आहे. सनी फुलमाळीने आपल्या मेहनती, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर आष्टीचं नाव उज्ज्वल केलं आहे.अशा तरुण खेळाडूंना प्रोत्साहन देणं ही आपली जबाबदारी आहे. सनीचं हे यश ग्रामीण भागातील असंख्य तरुणांना प्रेरणा देणारं आहे. लवकरच त्याचा गौरव करून सन्मान केला जाणार आहे.**
>
> **आ. सुरेश धस,आष्टी मतदारसंघ**

सनीचा खेळ पाहून रायबा तालीमचे वस्ताद पै. सोमनाथ मोझे आणि सदाशिव राखपसरे यांनी त्याला मार्गदर्शन सुरू केलं. पुढे लोणीकंद येथील जाणता राजा तालीममध्ये वस्ताद संदीप भोंडवे यांच्या प्रशिक्षणाखाली सनी अधिक परिपक्व झाला. वस्ताद भोंडवे यांनी त्याला दत्तक घेत सर्व खर्च उचलत सनीचं भविष्य घडवलं.सध्या सनी दहावीमध्ये शिक्षण घेत असून, महाराष्ट्र चॅम्पियनशिपमध्ये विजेतेपद आणि राष्ट्रीय स्पर्धेत रौप्यपदक जिंकल्यानंतर आता आशियाई युवा स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत देशाचा गौरव वाढवला आहे. आष्टी मतदारसंघाचे आ. सुरेश धस यांनी सनीचं अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या असून लवकरच त्याचा सत्कार आयोजित केला जाणार आहे.

## वन नेशन, वन इलेक्शन उपक्रम राबवा-आंधळे

बीड । प्रतिनिधी

दिनांक ९ ११ २०२५ देशामध्ये वारंवार होणाऱ्या प्रत्येक विभागाच्या निवडणूका मग त्यामध्ये सहकार विभाग असेल सार्वत्रिक निवडणूक असेल अशा विविध प्रकारच्या निवडणुका सतत देशांमध्ये सुरू असतात निवडणूक आयोगाची ग्रामपंचायत सरपंच निवडणूक ते खासदारकी निवडणूक इथपर्यंत स्वतःची यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केली आहे. १४० कोटी लोकसंख्या असलेल्या या भारत देशामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे विभाग आहेत त्यामध्ये सहकार विभाग आहे स्थानिक स्वराज्य संस्था पोलीस प्रशासन बँकिंग क्षेत्र अशा सार्वत्रिक निवडणूक या भारत देशामध्ये टप्प्या टप्प्याने पार पडत असतात भारतामध्ये जन्म आणि मृत्यू यांचे प्रमाण लक्षात घेता निवडणूक आयोगाने त्यांचा पारदर्शक कारभार करण्यासाठी त्यांची स्वतःची यंत्रणा निर्माण करणे आवश्यक आहे. लोकशाहीच्या संकेतानुसार निवडणुका शांततेत आणि निर्विघ्न पार पडल्या पाहिजेत यासाठी स्वतंत्र यंत्रणेची आवश्यकता आहे गेल्या कित्येक वर्षापासून निवडणूक आयोग शिक्षण विभाग, महसूल विभाग, सहकार विभाग, राज्य सरकारच्या वेगवेगळ्या खात्याचा आणि त्यांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांचा उपयोग करून निवडणुका घेण्याचे काम केले आहे याशिवाय मतदानाची नोंदणी करण्यासाठी सरकारी कर्मचाऱ्यांना घरोघर पाठवून मतदान नोंदणी आणि इतर सर्व कामे करून घेतली जातात यामध्ये एक बाजूला सदोष निवडणूक आयोगाची कार्यप्रणाली समोर आली आहे मतदाराचे डबल नाव अनेक वेळा नावाची नोंदणी होणे पत्ता बदलल्यानंतर दोन्ही ठिकाणी मतदाराची नोंदणी राहणे फोटो आणि इतर आवश्यक अपुरी माहिती मतदार यादी मध्ये असणे मतदार यादीतून नाव कमी करण्यासाठी अपुरीव्यवस्था असणे मृत्यू पावलेल्या लोकांची नावे यादीमध्ये कायम राहणे या आणि अशा विविध कारणांनी निवडणूक आयोगाच्या मतदार याद्या दोषपूर्ण राहतात या अत्यंत महत्त्वाच्या कामासाठी तात्पुरता कर्मचारी वर्ग घेऊन निवडणूक आयोग कामकाज करतो हे अत्यंत चुकीचे आहे केंद्रातील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २०१४ पासून अत्यंत क्रांतिकारक आणि लोकहितकारक निर्णय घेतलेले आहेत त्याचा परिणाम आज देशांमध्ये स्पष्टपणे दिसतो आहे जगाच्या पातळीवर भारताची निर्माण झालेली प्रतिष्ठा या सरकारची फलश्रुती आहे सर्व क्षेत्रात काम केल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी निवडणूक आयोगाची स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी विशेष लक्ष द्यावे ही विनंती या निवेदनाच्या द्वारे केली जात आहे निवडणूक आयोगासारखे महत्त्वाचे काम करण्यासाठी महसूल खात्याप्रमाणे गाव पातळीपासून निवडणूक आयोग कर्मचारी तालुका आणि जिल्हा निवडणूक आयोगाचे कार्यालय व कर्मचारी विभाग आणि राज्य पातळीवर आयुक्त आणि संचालक दर्जाचे कार्यालय राज्य आणि देश पातळीवर आज काम करत असलेले निवडणूक आयोगाचे कार्यालय आणि अधिकारी अशी निवडणूक आयोगाची स्वतंत्र रचना असली पाहिजे आणि ती कायमस्वरूपी इतर सर्व खात्याप्रमाणे शंभर टक्के अनुदानावर असली पाहिजे त्याशिवाय जन्म मृत्यूच्या नोंदी आणि मतदार याद्या अद्यावत होणार नाहीत देशाच्या लोकशाहीसाठी आणि प्रगतीसाठी निवडणूक आयोग सक्षम आणि कार्यक्षम असणे अत्यंत गरजेचे आहे याकडे राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे निवडणूक आयोगाची स्वतंत्र रचना आणि कार्यालय कार्यान्वित करावेत अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात येत आहे आपण या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून योग्य तो निर्णय घ्याल अशी अपेक्षा ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी या निवेदनामध्ये व्यक्त केली आहे.



## पान ६ वरून...

### बळजबरीने पिक

करण्यासाठी जाणुनबुजून अडथळा निर्माण करु शकता. करीता सशुल्क संरक्षण देण्याची मागणी केली होती यावर तात्काळ कार्य अनुपालन अहवाल सादर करण्याचे कळविण्यात आले होते. पण दिंद्रुड पोलीसांनी काहिच कार्यवाही केली नाही, सध्या शेतातील बाजरी पिकात गुर-ढोरांना चारत आहेत सोडुन दित नुकसान करीत आहेत व गावगुंड बोलावून सोयाबीनची कापणी करीत आहेत याबाबत ६नोव्हेंबर दिंद्रुड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी गेले असता उडवा,उडवीची उत्तरे दिली आहेत म्हणुन सदरील व्यक्ती सोयाबीन ची परस्पर विल्हेवाट लावण्याच्या तयारीत आहेत. प्रशांत पोलीसां शिवाय शेतात जाऊ शकत नाहीत कारण त्यांना त्या लोकां पासुन जीवाला धोका निर्माण झाला आहे अशाने पीक गेल्यावर वर्षभराची कमाई जाईल आणि आत्महत्या शिवाय पर्याय नाही हणून ते कायदेशीर कारवाई व पोलीसां कडे वारंवार तक्रारी करुन फार थकुन गेले आहेत. यावर इच्छा जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी त्यांच्या स्तरावर नमुद लोकां विरोधात ठोस कारवाई करावी जमत नसेल तर इच्छा मरणाची परवानगी द्यावी मरणाच्या पश्चात त्या व्यक्ती व दिंद्रुड पोलीसांना जबाबदार धरण्यात यावे अशी मागणी प्रशांत देवळे यांनी जिपोअ ला दिलेल्या अर्जात शेवटी म्हटले आहे.

### शिवसेनेने आदेश दिल्यास

एक मॉडर्न सर्कल व या सर्कलमधील शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शेतकरी मदत केंद्र, ज्येष्ठ व वृद्धांचे प्रश्न सोडविण्यासाठी गाव भेट दौरा, लोकांचे हॉस्पिटल मधील अडचणीसाठी हेल्पलाइन, विकास कामासाठी आराखडा, सुशिक्षित बेरोजगार तरुणासाठी कौशल्य विकास आधारित ट्रेनिंग प्रोग्राम, कंपनीचे नोकर भरतीसाठी कंपनीचा कॅम्प यासह सर्कलमधील मूलभूत गरजांसाठी आपण शिवसेना पक्षाकडे उमेदवारी मागणार असून शिवसेना पक्षाच्या जिल्हाप्रमुखांनी व वरिष्ठांनी निवडणूक लढवण्याचा आदेश दिल्यास आपण लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कलमध्ये निवडणूक लढवून लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कलवर शिवसेनेचा भगवा झेंडा फडकू असा आत्मविश्वासही शिवसेना उपजिल्हाप्रमुख तथा बीड मार्केट कमिटीचे संचालक गणेश उगले यांनी व्यक्त केला आहे.

### पवारांचे खंदे समर्थक

पवार यांचे कट्टर समर्थक म्हणुन ओळख असलेले समाधान मस्के यांच्यासह त्यांच्या शेकडो समर्थकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये जाहिर प्रवेश केला. आमदार विजयसिंह पंडित यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी व्यासपिठावर राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, शहराध्यक्ष दिपक आतकरे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, विनोद सौंदरमल, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष कालिदास नवले, पृथ्वीराज पंडित, रणवीर पंडित, माजी उपनगराध्यक्ष शेख खाजा, दादासाहेब घोडके, सरपंच शितल साखरे, शितल धोंडरे, बंडुसेठ मोटे यांच्या मान्यवर उपस्थित होते. याच परिसरात माजी नगरसेवक विठ्ठल पवार आणि त्यांच्या समर्थकांनी दोन दिवसापुर्वी प्रवेश केला होता. त्यावेळी माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी त्यांचे स्वागत केले. दोन दिवसात भाजपाचे खंदे समर्थक राष्ट्रवादीमध्ये आल्यामुळे शिवाजीनगर मधील भाजपाचा बुरुज ढासळल्याची चर्चा गेवराई शहरात सुरु आहे.

### बीड येथे शिक्षकांची

संपताच परीक्षक मंडळाच्या उपस्थितीत निकाल जाहीर करण्यात आला. या स्पर्धेत प्रेमनाथ पाटील (रायगड) यांनी प्रथम पारितोषिक, श्रीराम जाधव (बीड) यांनी द्वितीय पारितोषिक, तर कैलास तुपे (बीड) यांनी तृतीय पारितोषिक मिळवले. विजेत्यांना अनुक्रमे २५,०००, १५,००० आणि १०,००० रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र १० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या पारितोषिक वितरण समारंभात प्रदान करण्यात येणार आहे.या स्पर्धेचे परीक्षण प्रा.डॉ.विनोद किर्दक, प्रा.शरद सदाफुले आणि प्रा.संजय बागुल यांनी केले. विजेत्यांचा सन्मान करताना नालंदा फाउंडेशनचे संस्थापक प्रा.प्रदीप रोडे यांनी सांगितले की, देश महासत्ता व्हायचा असेल तर शिक्षकांनी स्वतःला अपग्रेड केलं पाहिजे. फक्त ज्ञान देणं नव्हे, तर समाजात बदल घडवणं ही आपली जबाबदारी आहे. वाचन थांबता कामा नये, विचार सतत जागे राहिले पाहिजेत. आपण बदललो, तरच विद्यार्थी बदलतील आणि देशही पुढे जाईल, असे त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य.डी.जी. निकाळजे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.अंकुश कोरडे यांनी, तर आभार प्रदर्शन प्रा.राम गायकवाड यांनी मानले. स्पर्धेसाठी आलेल्या सर्व शिक्षकांसाठी नालंदा फाउंडेशनतर्फे अल्पोपहार व भोजनाची विनामूल्य व्यवस्था करण्यात आली होती. हा उपक्रम नालंदा फाऊंडेशनचे पदाधिकारी, संयोजन समिती व स्वयंसेवक यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडला.कार्यक्रमास तुलसी शैक्षणिक समूहातील सर्व कर्मचारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हिमालयाची उत्तुंगता,गंगेची

स्वातंत्र्याचे प्रेरणास्थान व्हावे ईतकेच नव्हे तर त्याच्या नुसत्या दोन शब्दांनी या भारतमातेसाठी, या राष्ट्रासाठी सर्वस्व अर्पण करण्याचे सामर्थ्य प्रतीत व्हावे हीच या गीताची विलक्षण ताकदा आहे.१८९६ मध्ये कलकत्ता येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात रविंद्र ठाकुरांनी (टागोरांनी) वंदे मातरम् गायले.हे पहिले जाहिर गायन ठरले.१९०५ च्या वंगभंग विरोधी आंदोलनातील २० आगस्ट १९०५ च्या कलकत्त्याच्या टाऊन हाल येथील सभेत अचानक कोणीतरी वंदे मातरम् घोषणा केली.या प्रसंगापासुन वंदे मातरम् हे भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे युध्दघोष बनले .. इंग्रज सरकारला धाडकी भरवणारे शब्द व शस्त्र बनले असेही डा.सुपर्णा देशमुख यांनी शेवटी सांगितले.

## पाटंगण हे वेद घोषाचे पवित्र प्रांगण -त्रिपाठी

बीड । प्रतिनिधी

धर्मरक्षण, वेदमूर्तींचा सन्मान, वेद घोषाने पवित्र प्रांगणाची ४२५ वर्षांची दिव्य परंपरा असलेले पाटंगण हे संस्थान जनीजनार्दन स्वामींच्या तपश्चर्याची ही तपोभूमी आहे, अशा शब्दात राष्ट्रीय संस्कृत विश्वविद्यालय तिरुपतीचे राधागोविंद त्रिपाठी यांनी पाटंगण संस्थांनच्या कार्यक्रमाची सफलता आणि धर्मरक्षण कामाचा यथोचित गौरव आपल्या मुख्य अतिथी भाषणातून केला.



त्यांच्या शुभहस्ते अद्वैत वेदांत रत्न पं. प्रमोदशास्त्री कुलकर्णी (परभणी )यांचा वै. धुंडीराज महाराज पाटंगणकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ देण्यात येणारा ''विद्वन्मणि'' हा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते .

जे वेदात तेच संतवाङ्मयात, वेद, ऋषी, आचार्य परंपरा संत परंपरेत परिवर्तित झालेली आहे. सर्वात एक वाक्यताच आहे. भेदाभेद किंवा विरोध कुठेही नाही. मोक्षमार्गाचे तत्त्व ,परम कल्याणासाठी भक्तिमार्ग, सर्व स्थळी भगवंत हेच मनाच्या श्लोकातून, तुकोबांच्या अभंगातून किंवा हनुमान चालीसातून आहे, असा महत्त्वपूर्ण संदेश देत वै. धुंडीराज महाराजांची वेदाबद्दलची तळमळ त्यांचे मोठेपण आणि ऋणानुबंधातून आशीर्वाद रुपी हा पुरस्काराचा प्रसाद प्राप्त झाल्याबद्दल चा आनंद आपल्या मनोगतातून पं. प्रमोद शास्त्री यांनी यावेळी व्यक्त केला.

व्यक्ती आपल्या पुरता विकासाचा विचार करतो आहे, व्यक्ती केंद्रीत समाज होतो आहे. संतांची शिकवण समाज आणि राष्ट्र विकासची असते, महाप्रभू चैतन्य स्वामी जगन्नाथाच्या सेवेत समर्पित राहून कोणतीही इच्छा न ठेवता तुझ्या चरणात सदैव भक्ती रहावी एवढीच अपेक्षा करतात. भौतिक सुखाची इच्छा नसते तिथेच संत दर्शन असते. सतत प्रभू चरणी लीन असावे हेच कार्य, जीवनाचे लक्ष त्यांचे असते. असेही ते म्हणाले.

## आ.धस यांच्या तत्परतेमुळे आयेशा बेगम शेख यांना उपचारांसाठी मिळाला आधार

### मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून एक लाख रुपयांची मदत

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील मुस्लिम मोहल्ला प्रभाग क्रमांक आठ येथील आयेशाबेगम मोहम्मद सुलेमान शेख या तरुण महिलेला अचानक मेंदूचा गंभीर आजार झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर त्यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला. आयेशाबेगम यांचे पती मोहम्मद सुलेमान शेख हे शहरातील एका औषधी दुकानात कामगार असून, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. त्यामुळे उपचाराचा प्रचंड खर्च कसा भागवायचा, हा मोठा प्रश्न त्यांच्या समोर उभा राहिला होता.

डॉक्टरांनी तपासणीनंतर आयेशाबेगम यांना अहिल्यानगर येथील मॅक्स केअर हॉस्पिटलमध्ये तातडीने मेंदूवरील शस्त्रक्रिया (ईरळप डीसशी) करण्याचा सल्ला दिला. मात्र उपचाराचा खर्च लाखोंमध्ये असल्याने कुटुंब हतबल झाले होते. याची माहिती प्रभाग क्रमांक आठ चे नगरसेवक असिफ शेठ सौदागर यांना मिळताच त्यांनी तातडीने पुढाकार घेतला आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार सुरेश धस यांच्याशी संपर्क साधला.आमदार धस यांनी नेहमीप्रमाणे संवेदनशीलता दाखवत तातडीने मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधून मदतीचा प्रस्ताव सादर केला. त्यांच्या प्रभावी पाठपुराव्यानंतर अवघ्या काही दिवसांतच मॅक्स केअर हॉस्पिटलच्या खात्यावर एक लाख रुपयांची मदत जमा करण्यात आली.

या मदतीमुळे आयेशाबेगम यांच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आणि शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, वेळेत मदत मिळाल्यामुळे रुग्णाचे प्राण वाचवणे शक्य झाले. या घटनेने पाटोदा शहरात आमदार धस आणि नगरसेवक सौदागर यांच्या संवेदनशील कार्यशैलीची पुन्हा एकदा प्रचीती दिली आहे.

## धारूर येथे वंदे मातरम राष्ट्रगीताचे समूह गाण अधिकारी वर्गांनी मात्र फिरवली पाठ

किल्लेधारूर । प्रतिनिधी

येथे महर्षी सुश्रत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने वंदे मातरमच्या दीडशे वर्ष पूर्ण झाल्याबद्दल वंदे मातरम गीताचे समूह गान कार्यक्रम धारूर येथील राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला विविध शाळेचे विद्यार्थी व नागरिक यावेळी उपस्थित होते. मात्र तालुक्यातील सर्वच अधिकारी वर्गाने या राष्ट्रगीताच्या समूह गानाकडे पाठ फिरवल्याचे दिसून आले व सर्वांचीच गैरहजरी यावेळी दिसून आली

धारूर येथील महर्षी सुश्रुत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या वतीने राजमाता जिजाऊ महाविद्यालयाच्या मैदानावर वंदे मातरम च्या दीडशे वर्ष पूर्ण झाल्याबद्दल या राष्ट्रगीताच्या समूह गान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य गोपाळ काकडे हे तर यावेळी प्रमुख वक्ते म्हणून निमेश चिद्रवार हे उपस्थित होते यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून तालुका समितीचे सदस्य पत्रकार अनिल महाजन प्राचार्य विजय शिनगारे ईश्वर उमाप कापसे आदी उपस्थित होते. यावेळी प्रथम वंदे मातरम गीताचे समूह गान करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली व यावेळी भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून वंदे मातरम विषयी वक्ते निमेश चिद्रवार यांनी सविस्तरपणे सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले यावेळी प्राचार्य गोपाळ काकडे यांनीही अध्यक्षीय भाषण केले या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार अनिल महाजन यांनी तर सूत्रसंचालन मुंजाराम निरडे यांनी केले आभार प्रदर्शन पी एस मुळे यांनी केले . यावेळी शहरातील शासकीय आय टि आयचे कर्मचारी शेख जे.यु, घोलक एस व्ही, मस्के एस एन, मुळे पी एस, आंबरुळे पी डी, वावळे ए पी, हंबीरे सर विविध शाळेचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

अधिकारी वर्गाने फिरवली पाठ

या राष्ट्रगीत गायन कार्यक्रमास सर्व अधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे बंधनकारक असताना तालुकास्तरीय एकही विभागाचा अधिकारी या कार्यक्रमाकडे फिरकला नाही व या कार्यक्रमाकडे दुर्लक्ष केले त्यामुळे अधिकारी वर्गाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

## डॉ. मनसबदार यांच्या मागे जनतेचा विश्वास, कार्यकर्त्यांचा पाठिंबा

### पुन्हा पंचायत समितीच्या रिंगणात उतरावेत, अशी सर्व कार्यकर्त्यांची मागणी

पात्रुड । प्रतिनिधी

पात्रुड गणात गेल्या दहा वर्षांपासून जनसामान्यांच्या मनावर राज्य करणारे, सेवाभावी आणि कार्यक्षम नेते डॉ. वासिम मनसबदार पुन्हा एकदा पंचायत समिती निवडणुकीत उतरावेत, अशी जोरदार मागणी जनतेतून होत आहे. त्यांच्या प्रामाणिक आणि जनहित असलेल्या कार्यामुळे ते आज पात्रुड गणातील लोकांसाठी विश्वासाचे प्रतीक बनले आहेत.

गेल्या १० वर्षांपासून निर्विवादपणे पंचायत समिती, पात्रुड गण मधून निवडून येणारे डॉ. वासिम मनसबदार यांनी त्यांच्या कार्यकाळात पंचायत समिती सदस्य ते पंचायत समिती उपसभापती म्हणून जबाबदारी समर्थपणे सांभाळली. कार्यकाळात त्यांनी केवळ राजकीय पदाचा सन्मान राखत लोकसेवेचे साधन बनवून प्रत्येक नागरिकाच्या अडचणीसाठी तत्पर राहून कार्य केले.शिक्षण, आरोग्य, शेती आणि सामाजिक विकास या सर्वच क्षेत्रांमध्ये डॉ. मनसबदार यांनी अनेक उपक्रम राबवले. ग्रामपातळीवरच्या विकास आराखड्यांपासून ते सामान्य शेतकऱ्यांच्या अडचणीपर्यंत त्यांनी नेहमी पुढाकार घेतला. शासनाच्या विविध योजना प्रत्यक्ष



लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, शाळांमधील सोयीसुविधा वाढविणे, तरुणांना मार्गदर्शन करणे आणि महिला बचत गटांना प्रोत्साहन देणे या क्षेत्रांत त्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.जनतेच्या म्हणण्यानुसार, डॉ. वासिम मनसबदार हे आमच्यासाठी आधारवडासारखे आहेत. कोणतीही अडचण आली की ते स्वतः पुढे येतात, अशा भावना नागरिक व्यक्त करत आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली पंचायत समिती पात्रुड गणात अनेक पायाभूत विकासकामांना चालना मिळाली आहे.

डॉ. मनसबदार हे आपल्या संयमी, विचारशील आणि सर्वसमावेशक नेतृत्वशैलीसाठी ओळखले जातात. त्यांच्या मागे निष्ठावान कार्यकर्त्यांची मोठी फौज असून, हीच त्यांची खरी ताकद मानली जाते. नेहमी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन चालणे, त्यांच्या मतांना महत्त्व देणे आणि संघटित पद्धतीने काम करणे ही त्यांची कार्यपद्धती आहे.डॉ. वासिम मनसबदार हे पंचायत समिती गणातील जनतेच्या मनातील उमेदवार आहेत. त्यांच्याकडे अनुभव, जनाधार आणि विकासदृष्टी या तिन्ही गोष्टी आहेत. निवडणूक जाहीर होताच ते पुन्हा एकदा जनतेच्या मनात आपले स्थान अधिक मजबूत करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

जनतेतून उमटणाऱ्या या प्रचंड प्रतिसादामुळे डॉ. वासिम मनसबदार यांनी पुन्हा निवडणूक लढवावी, अशी मागणी आता खुलेआम होऊ लागली आहे. लोकांच्या विश्वासाचा आणि विकासाच्या वाटचालीचा हा प्रवास पुन्हा सुरू व्हावा, अशी अपेक्षा आज पात्रुड गणातील प्रत्येक नागरिक व्यक्त करीत आहे.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
सोमवार दि.१० नोव्हेंबर २०२५
४

# पोल्ट्री निर्यातीत दुपटीने वाढ, भारतीय अंड्यांना जगभरातून मोठी मागणी

पुणे : मध्य पूर्वेतून अंड्यांच्या मागणीत वाढ झाली आहे. यामुळे चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत भारतातून पोल्ट्री निर्यात दुप्पट होऊन ती सुमारे १४९ दशलक्ष डॉलर्सवर पोहोचली. गेल्या वर्षी याच कालावधीत अंडी आणि अंडी उत्पादनांसारख्या पोल्ट्री उत्पादनांची निर्यात ७१.१६ दशलक्ष डॉलर्स एवढी होती. आता यात दुपटीने वाढ झाली आहे.

पैशांच्या बाबतीत पाहिले तर, चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत पोल्ट्री निर्यातीतून १,२८८.६३ कोटींची उलाढाल झाली. विशेषतः संयुक्त अरब अमिरात आणि ओमानसारख्या देशांतून अधिक मागणी असल्यामुळे भारतीय पोल्ट्री निर्यातीत वाढ झाली आहे. याच कालावधीत इतर देशांकडून होणारा पुरवठा कमी झाला होता. ओमान हा भारतीय अंड्यांचा सर्वात मोठा खरेदीदार देश आहे. दरम्यान, डीजीसीआयएसच्या देशनिहाय निर्यात आकडेवारीनुसार, यावर्षी चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत युएई हा सर्वात मोठा खरेदीदार ठरला आहे. त्याने याबाबतीत ओमानला मागे टाकले. गेल्या वर्षी भारतीय अंड्यांसाठी युएईने त्यांची बाजारपेठ खुली केली होती. आता या देशात मोठ्या प्रमाणात अंडी आयात केली



जात आहेत. त्यांनी आमची उत्पादने चांगल्या प्रकारे स्वीकारली आहेत आणि दर्जा टिकवून ठेवला आहे,'' असे ऑल इंडिया पोल्ट्री एक्सपोर्टर्स असोसिएशनचे सचिव वालसन परमेश्वरन यांनी सांगितले. ''तुर्की आणि इराणमध्ये उत्पादनाच्या समस्यांमुळे जागतिक स्तरावर पोल्ट्री उत्पादनांचा पुरवठा कमी झाला आहे. यामुळे भारतातातून निर्यातीला संधी मिळाली. तुर्की आणि इराणमधून मध्यपूर्वेतील देशांत पोल्ट्री उत्पादनांचा पुरवठा केला जातो,'' असे ते म्हणाले. तसेच तुर्कीतून अमेरिकेत पुरवठा केला जातो. पण तेथे देशांतर्गत उत्पादनाच्या समस्यांमुळे टंचाई निर्माण झाली आहे. भारतातून या वर्षी जूनमध्ये पहिल्यांदाच तामिळनाडूच्या नामक्कल येथून एक कोटी अंड्यांचा पुरवठा केला. पण अमेरिकेकडून पुढील कोणतेही ऑर्डर अद्याप मिळालेले नाही. युएई आणि ओमानसह, जपान आणि इंडोनेशियातून भारतीय अंडी आणि अंडी उत्पादनांना मोठी मागणी आहे. ''भारतीय पोल्ट्री उत्पादनांच्या मागणीत वाढ कायम राहण्याची शक्यता आहे. जानेवारीपर्यंत चांगली मागणी राहील आणि हे आर्थिक वर्ष पोल्ट्री निर्यातीसाठी चांगले राहील,'' असा आशा परमेश्वरन यांनी व्यक्त केली आहे. कृषी आणि प्रक्रिया अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाच्या माहितीनुसार, २०२४-२५ मध्ये भारताच्या पोल्ट्री निर्यातीत सुमारे ९ टक्क्यांनी घट झाली. ही निर्यात मागील वर्षीच्या २०५ दशलक्ष डॉलर्सच्या तुलनेत १८५.९८ दशलक्ष डॉलर्सपर्यंत खाली आली होती. पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विभागाच्या गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये जाहीर केलेल्या प्राथमिक पशुसंवर्धन सांख्यिकी २०२४ नुसार, देशात २०२३-२४ मध्ये एकूण १४२.७७ अब्ज अंडी उत्पादन झाल्याचे मानले जाते. २०१४-१५ मधील ७८.४८ अब्ज अंड्यांच्या तुलनेत गेल्या १० वर्षात ६.८ टक्के वाढ नोंदवली गेली. तर, २०२२-२३ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये उत्पादनात दरवर्षी ३.१८ टक्क्यांनी वाढ झाली.

## नारळ फळबागात रोगांचा प्रादुर्भाव, अशा पद्धतीने करा नियंत्रण



महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागामध्ये नारळ फार मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. परंतु आता नारळाची लागवड महाराष्ट्रातील इतर भागात देखील बऱ्या प्रमाणात होऊ लागल्यामुळे तसेच बऱ्याच शेतकऱ्यांच्या बांधांवर वगैरे मिळून देखील शेतामध्ये १० ते २० झाडे असतातच. जर आपण नारळ या फळ पिकाचा विचार केला तर यावर देखील इतर फळबागांप्रमाणे काही रोगांचा प्रादुर्भाव होत असतो व त्यामुळे बरेच नुकसान होते. त्यामुळे या लेखामध्ये आपण नारळ फळबागेतील काही महत्त्वाचे रोग व त्यावरील नियंत्रणाचे उपाय याबद्दल माहिती.

नारळ झाडावरील काही महत्त्वाचे रोग : नारळाची फळगळ - हा रोग नारळाच्या कोवळ्या फळाच्या देठावर होतो, त्यामुळे नारळाचे फळे गळून पडतात. सुरुवातीच्या काही कालावधीमध्ये नारळाच्या झाडांना फळ धरण्यासाठी मादी फुलांना नर फुलातील पुकेसर न मिळाल्यामुळे फळांची नैसर्गिक गळ होते. तसंच काही बुरशीजन्य रोगांमुळे देखील फळगळ होते.

नियंत्रणाचे उपाय - या रोगाच्या नियंत्रणासाठी एक टक्का बोर्डो मिश्रणाच्या दोन फवारण्या एक महिन्याच्या अंतराने फवाराव्यात. पहिली फवारणी पावसाळ्याच्या सुरुवातीला व त्यानंतरची एक महिन्यानंतर करावी. बऱ्याचदा नारळाच्या फळांची गळ प्रामुख्याने उंदरांच्या प्रादुर्भावामुळे होते. यामध्ये उंदीर नारळाची कोवळी फळे पोखरतात. उंदरांच्या बंदोबस्तासाठी झावळ्या स्वच्छ ठेवाव्यात. औषध दिल्यानंतर ४५ दिवस नारळ काढू नये तसेच नारळास दहा किलो निंबोळी पेंड, झिंक, बोरॉन आणि कॉपर सारखे अति सूक्ष्म अन्नद्रव्य २०० ग्रॅम प्रति झाड दरवर्षी द्यावे.

नारळाच्या झाडावरील करपा रोग- बऱ्याचदा नारळाच्या झाडाच्या पानावर करपा रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. यामुळे पानावर लालसर तपकिरी रंगाचे ठिपके पडून पाने पिवळी होतात. अशा ठिपक्यांचे प्रमाण हे पक्क असलेल्या पानांवर जास्त प्रमाणात दिसून येते. सुरुवातीला हे ठिपके अतिशय लहान असतात परंतु नंतर ते वाढत जाऊन एकमेकांमध्ये मिसळतात व पूर्ण पान करपून जाते.

नियंत्रणाचे उपाय - करपा रोगाचा प्रादुर्भाव हा पाण्याच्या आणि खताच्या कमतरतेमुळे मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे पावसाळयानंतर बागेला नियमितपणे पाणी व्यवस्थापन करणे गरजेचे असून शेणखत आणि रासायनिक खते योग्य प्रमाणात द्यावीत. एवढेच नाही तर पावसाळा सुरू होण्यापूर्वी रोगग्रस्त झाडावरील करपलेल्या झावळ्या काढून माडाच्या निरोगी पानांवर एक टक्के तीव्रतेचे बोर्ड मिश्रण आता दोन ग्रॅम मॅन्कोजॅब एक लिटर प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## सिमला मिरचीची शेती करताय? तर लगेचच जाणून घ्या रोग आणि प्रतिबंधात्मक उपाय

सिमला मिरची आरोग्याच्या दृष्टीने खूप फायदेशीर असते. घरामध्ये तयार केलेली भाजी असो किंवा रेस्टॉरंटमध्ये बनवलेले चायनीज असो, प्रत्येक पदार्थाची चव वाढवण्याचे काम सिमला मिरची करत असते. त्यामुळे स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारापेठांमध्ये सिमला मिरचीची मोठ्या प्रमाणात मागणी आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये मुबलक प्रमाणात पाणी असल्याने या मिरचीच्या लागवडीसाठी हा महिना उत्तम मानला जातो. जर तुम्ही लागवड करत असाल तर रोग आणि त्यापासून बचाव करण्याचे उपाय माहिती असावेत.

सिमला मिरचीच्या पानांवर पिवळे प्रभामंडल असणारे लहान लहान ठिपके पाहायला मिळतात. कालांतराने ते तपकिरी किंवा काळे होत जातात. हा रोग टाळण्यासाठी तुम्ही प्रतिकारक वाणांचा वापर करणे गरजेचे आहे. इतकेच नाही तर जमिनीमध्ये रोगजनकांना प्रतिबंध करण्यासाठी पीक लागवडीची जागा बदलत राहणे गरजेचे आहे. तसेच पिकाच्या आजूबाजूला पाणी साचू देऊ नये. कारण असे झाले तर देठ आणि फळांवर खोल जखम पाहायला मिळत असून यामुळे पाने कोमेजून कुजण्याची शक्यता असते. पानांवर जास्त पाणी आणि सिंचन टाळावे.

त्याशिवाय रोगाचा प्रसार रोखण्यासाठी संक्रमित झाडे काढून टाकावी ज्यात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मेटालॅक्सिल किंवा फोसेटाइल-ॲल्युमिनियम बुरशीनाशकाचा वापर करावा. पाने, देठ आणि फळांवर पांढरे पावडर ठिपके पाहायला मिळतात. हा रोग टाळायचा असेल तर हवेच्या चांगल्या अभिसरणासाठी झाडांमध्ये पुरेसे अंतर ठेवणे गरजेचे आहे. प्रतिबंधात्मक उपायासाठी सल्फर किंवा पोटॅशियम बायकार्बोनेट-आधारित बुरशीनाशक वापरणे गरजेचे आहे. त्याशिवाय सिमला मिरचीची पाने पिवळी पडून कोमेजतात. तर अनेकदा ही पाने पूर्णपणे कोमेजून जातात. जर तुम्हाला हे टाळायचे असेल तर रोगमुक्त बियाणे आणि रोपांचा वापर करावा. चांगल्या निचरा होणाऱ्या जमिनीत सिमला मिरचीची लागवड करावी. महत्त्वाचे म्हणजे या रोगासाठी कोणतेही प्रभावी रासायनिक उपचार नसल्याने प्रतिबंध आणि व्यवस्थापन धोरणांवर लक्ष द्यावे. जर तुम्हीही सिमला मिरचीची लागवड करत असताना या गोष्टींचा विचार केला तर तुम्हाला भरघोस उत्पन्न मिळेल.




## कापूस पिकावर बोंडसड रोगाचा प्रादुर्भाव आणि उपाय !

सततचा आणि जास्त पाऊस, ढगाळ वातावरण आणि हवेतील अति आर्द्रता यामुळे कापूस पिकात हिरव्या बोंडातील आतील भाग सडण्याची समस्या प्रामुख्याने बोंडे विकसित होण्याच्या अवस्थेत आढळत आहे, यालाच बोंडसड असे म्हणतात. अशी बोंडे बाहेरून निरोगी दिसत असली तरी अशी हिरवी बोंडे फोडून बघितल्यावर आतील रुई व बिया प्रामुख्याने पिवळसर गुलाबी ते लाल रंगाच्या होऊन सडल्याचे आढळते. साधारणतः बोंडातील एक ते दोन कप्पे, तर काही ठिकाणी संपूर्ण बोंड सडल्याचे आढळले. अनेक ठिकाणी बोंडसडचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्यावर आढळून येतो. त्यामुळे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. जाणून घेऊ या या रोगाची कारणे आणि उपाय.

बोंडसड रोगाची कारणे : जास्त पाऊस, सतत ढगाळ वातावरण आणि हवेतील अति आर्द्रता बोंडसड साठी पोषक वातावरण आहे. रोगकारक बुरशी, जीवाणू, रस शोषक ढेकूण व किडी यांच्याद्वारे या रोगाचा प्रसार होतो.

बोंडसड प्रकार - बाह्य बोंडसड - बोंडाच्या पृष्ठभागावर होणारा संसर्ग: या प्रकारात मुख्यतः



काही रोगकारक बुरशी, कुजलेल्या अवशेषांवर जगणारे सूक्ष्मजीव तसेच काही प्रमाणात बोंडावरील जीवाणू कारणीभूत असतो.

आंतरिक बोंडसड - कमी प्राणवायु अवस्थेत तग धरणारे जीवाणू, रोगकारक जीवाणू आणि काही प्रमाणात रोगकारक बुरशीच्या संसर्गामुळे आंतरिक बोंडसड होते. अशी बोंडे बाहेरून निरोगी दिसतात. मात्र आतील रुई पिवळसर-गुलाबी ते लाल-तपकिरी रंगाची होऊन सडते. विकसित अवस्थेतील बियासुद्धा सडल्याचे आढळतात.

बोंडसड रोगाचे एकात्मिक नियंत्रण : सिंचन आणि नत्रयुक्त खताचा अतिरिक्त वापर टाळावा. चांगल्या व्यवस्थापन पद्धतींद्वारा कापूस पिकाची अतिवाढ रोखावी. लाल रंगाच्या ढेकणापासून पिकाचे संरक्षण करावे.बोंडाच्या पृष्ठभागावर होणारा बुरशीचा संसर्ग रोखण्यासाठी खालील प्रमाणे फवारणी करावी. कार्बेन्डाझिम (१२ टक्के) + मॅन्कोझेब (६३ टक्के डब्ल्यू.पी.) (संयुक्त बुरशीनाशक) ०.३ ग्रॅम प्रति लिटर पाणी फवारणी करावी. किंवा कार्बेन्डाझिम (५० टक्के डब्ल्यू.पी.) ०.४ ग्रॅम किंवा मेटीराम (५५ टक्के) + पायराक्लोस्ट्रोबिन (५ टक्के डब्ल्यू.जी.) २ ग्रॅम किंवा प्रोपीकोनॅझोल (२५ टक्के ई.सी.) १ मि.लि. किंवा ॲझोक्सीस्ट्रॉबीन (१८.२ टक्के डब्ल्यू/डब्ल्यू) + डायफेनोकोनॅझोल (११.४ टक्के डब्ल्यू/डब्ल्यू एस.सी.) (संयुक्त बुरशीनाशक) १ मि.लि. किंवा प्रोपीनेब (७० टक्के डब्ल्यू.पी.) २.५ ते ३ ग्रॅम आवश्यकतेनुसार १५ दिवसांच्या अंतराने बुरशीनाशक बदलून दुसरी फवारणी करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१५८० : स्पेन या देशाच्या सेनेने आयर्लंड देशावर आक्रमण केले होते.
१७९४ : तत्कालीन रशियाच्या सेनेने पोलंडची राजधानी वारसा ताब्यात घेतली होती.
१९०६ : आपल्या कार्यकालात देशाबाहेर जाणारे थिओडोर रुझव्हेल्ट हे अमेरिकेचे पहिले राष्ट्राध्यक्ष बनले. त्यांनी पनामा कालव्याला भेट दिली.
१९२३ : दिनचर्या नावाचे एक पत्र दतात्रय गणेशजी यांनी पुण्यात सुरु केले.
१९३७ : जपानी सैन्याने चीनमधील शांघाय शहराचा ताबा घेतला.
१९४७ : भारत सरकारने जूनागढ संस्थान बरखास्त करुन ताब्यात घेतले.
१९४९ : कोस्टारिका या देशाने संविधानाचा अंगीकार केला होता.
१९५३ : कंबोडियाला (फ्रान्सपासून) स्वातंत्र्य मिळाले.
१९५४ : दार्जीलिंग या थंड हवेच्या ठिकाणी हिमालय पर्वतारोहण संस्थेची स्थापना करण्यात आली होती.
१९६० : रॉबर्ट मॅकनामारा हे फोर्ड मोटर कंपनीचे अध्यक्ष बनले. 'फोर्ड' आडनाव नसणारे ते पहिलेच अध्यक्ष होते. मात्र जॉन केनेडी यांच्या मंत्रीमंडळात स्थान मिळाल्यामुळे एक महिन्यातच त्यांनी राजीनामा दिला.
१९६५ : इलेक्ट्रिसिटी ग्रिड खराब झाल्याने न्यूयॉर्क शहरासह पूर्व अमेरिकेतील बर्याच भागाचा वीजपुरवठा १२ तास खंडित झाला.
१९६७ : रोलिंग स्टोन मासिकांचा पहिला अंक प्रकाशित झाला.
१९८८ : मुंबईतील भारत पेट्रोलियमच्या शुद्धीकरण संकुलातील दुर्घटना, भीषण आगीत १२ जण मृत्युमुखी.
१९८९ : ब्रिटनने मृत्यू दंडाच्या शिक्षेवर पूर्णपणे बंदी घातली होती.
१९९७ : साहित्यिक गंगाधर गाडगीळ यांना 'कुसुमाग्रज प्रतिष्ठान'चा जनस्थान पुरस्कार प्रदान
२००० : उत्तराखंड उच्च न्यायालयाची स्थापना
२००० : न्यूयॉर्क येथे झालेल्या एका लिलावात पाब्लो पिकासोचे एक चित्र पाच कोटी छप्पन्न लाख डॉलरला विकले गेले. पिकासोच्या चित्रासाठी मिळालेली ही विक्रमी किंमत आहे.
२००० : उत्तराखंड राज्याची निर्मिती.
२००१ : पूर्व पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी आजच्याच दिवशी संयुक्त राष्ट्र या जागतिक संस्थेच्या महासभेला संबोधित केले होते.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१४८३ : मार्टिन ल्युथर यांचा जन्म झाला होता.
१८०१ : आटवलेल्या दुधाचे शोधक गेल बोर्डन यांचा जन्म. (मृत्यू: ११ जानेवारी १८७४)
१८६७ : जैन तत्त्वज्ञानी, विद्वान, कवी श्रीमद राजचंद्र यांचा जन्म. (मृत्यू: ९ एप्रिल १९०१)
१८७७ : सारे जहाँन से अच्छा चे पाकिस्तानी कवी, तत्त्वज्ञ आणि राजकीय नेते कवी मोहम्मद इक़्बाल यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल १९३८)
१८८९ : प्रसिध्द भारतीय पत्रकार इंद्र विद्यावाचस्पती यांचा जन्म झाला होता.
१९०४ : पंचानन माहेश्वरी सपुष्प वनस्पतींतील पुनरुत्पादन क्रियेसंबंधी संशोधन करणारे वनस्पतीशास्त्रज्ञ (मृत्यू: १८ मे १९६६)
१९१८ : तायक्वोंडो मार्शल आर्ट चे निर्माते चोई हाँग हाय यांचा जन्म. (मृत्यू: १५ जून २००२)
१९२४ : पं. चिंतामणी रघुनाथ तथा सी. आर. व्यास ख्यालगायक, गुरु व बंदिशकार (मृत्यू: १० जानेवारी २००२)
१९३१ : एल. एम. सिंघवी लोकसभा सदस्य, कायदेपंडित, विद्वान, मुत्सद्दी व भारताचे इंग्लंडमधील राजदूत (मृत्यू: ६ आक्टोबर २००७)
१९३४ : कार्ल सगन - अमेरिकन अंतराळतज्ञ, लेखक व विज्ञानप्रसारक. यांनी सुमारे ६०० हून अधिक शोध निबंध प्रकाशित केले. शुक्राच्या पृष्ठभागावरील उच्च तापानाचा शोध त्यांच्या प्रयत्नामुळे लागला. (मृत्यू: २० डिसेंबर १९९६- सिॲटल, वॉशिंग्टन, यु. एस. ए.).
१९३६ : प्रसिध्द हिंदी कवी सुदाम पांडे यांचा जन्म झाला होता.
१९४४ : भारतीय कोरिओग्राफर चितेश दास यांचा जन्म. (मृत्यू: ४ जानेवारी २०१५)
१९८० : पायल रोहतगी - अभिनेत्री व मॉडेल.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२२ : फ्रांस येथील प्रसिध्द विदुषक रेमंड डेवोस यांचा जन्म झाला होता.
१९४० : नेव्हिल चेंबरलेन - इंग्लंडचे पंतप्रधान (जन्म: १८ मार्च १८६९)
१९४१ : संस्कृत भाषेचे पंडित व विद्वान गंगानाथ झा यांचे निधन झाले होते.
१९५२ : चेम वाइझमॅन - इस्त्राएलचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: २७ नोव्हेंबर १८७४)
१९६२ : महर्षी अण्णासाहेब तथा धोंडो केशव कर्वे - स्त्रीशिक्षण व विधवा विवाह यातील कर्ते समाजसुधारक, पद्मभूषण, भारतरत्न (जन्म: १८ एप्रिल १८५८)
१९६७ : नटवर्य बाबूराव पेंढारकर (जन्म: १८९७)
१९७० : चार्ल्स द गॉल - फ्रेन्च राष्ट्राध्यक्ष आणि सेनापती (जन्म: २२ नोव्हेंबर १८९०)
१९७७ : केशवराव भोळे - गायक, अभिनेते, संगीत समीक्षक, संगीत रचनाकार, संगीत दिग्दर्शक व लेखक. 'अमृतमंथन', 'संत तुकाराम', ' कुंकू', 'माझा मुलगा',' संत ज्ञानेश्वर', 'संत सखू' आदी बोलपटांतील गीतांच्या स्वररचना आणि संगीत दिग्दर्शन त्यांनी केले होते. 'एकलव्य' या टोपणनावाने त्यांनी 'वसुंधरा' या साप्ताहिकात अभिजात गायक-गायिकांविषयीचे लेख लिहिले. क्रिकेटवरही ते अभ्यासपूर्ण लेखन करत असत. (जन्म: २३ मे १८९६)
२००० : मिस वर्ल्ड स्पर्धेचे निर्माते एरिक मॉर्ले यांचे निधन. (जन्म: २६ सप्टेंबर १९१८)
२००३ : मैथिली भाषेतील लेखक व कवी विनोद बिहारी वर्मा यांचे निधन.
२००५ : फ्रांस या देशात आजच्याच दिवशी आणीबाणी घोषित करण्यात आली होती.


राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
सोमवार दि.१० नोव्हेंबर २०२५
५

# सोशल मीडियावरील धमक्यांनी घेतला तरुणाचा बळी

जालना । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथील फलकाजवळ लघुशंका केल्याच्या घटनेनंतर सोशल मीडियावर झालेल्या ट्रोलिंग आणि सततच्या धमक्यांना कंटाळून परतूर तालुक्यातील महेश संजय आढे या २१ वर्षीय युवकाने आत्महत्या केल्याची घटना अत्यंत दुर्दैवी आणि चिंताजनक आहे. माफी मागूनही धमक्यांचे सत्र न थांबल्याने एका तरुणाला आपले जीवन संपवावे लागले, ही बाब समाजासाठी आत्मचिंतन करणारी आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया 'देण्यात येत आहे. ॲड. धन्नावत यांनी या घटनेचा तीव्र निषेध करत म्हटले की, कोणत्याही व्यक्तीला, मग ती कोणीही असो, कायदा हातात घेण्याचा किंवा कोणाच्याही जीवितास धोका निर्माण करण्याचा अधिकार नाही. आपल्या देशात कायद्याचे राज्य आहे आणि प्रत्येकाने संविधानिक चौकटीत राहूनच आपले मत व्यक्त केले पाहिजे. एखाद्याच्या चुकीवर त्वरित प्रतिक्रिया देऊन त्याला सामाजिक बहिष्काराची किंवा जीवे मारण्याची धमकी देणे, हे केवळ बेकायदेशीरच नाही, तर अमानवी कृत्य आहे.

कायदेशीर तरतुदी आणि शिक्षा ॲड. धन्नावत यांनी या प्रकारच्या गुन्ह्यांसाठी असलेल्या कठोर कायदेशीर तरतुदींची माहिती दिली. ते म्हणाले एखाद्या व्यक्तीला सततच्या त्रासाने, धमकीने किंवा छळाने आत्महत्या करण्यास भाग पाडणे, हा भारतीय दंड संहिता कलम ३०६ नुसार गंभीर गुन्हा आहे. यासाठी दोषी आढळल्यास १० वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि दंडाची शिक्षा होऊ शकते. नवीन भारतीय न्याय संहिता () मध्येही कलम १०६ अंतर्गत अशाच प्रकारच्या शिक्षेची तरतूद आहे. या गुन्ह्यात आरोपीचा तसा



उद्देश होता हे सिद्ध करणे महत्त्वाचे असते. जीवे मारण्याची किंवा गंभीर इजा पोहोचवण्याची धमकी देणे, हा भारतीय दंड संहिता कलम ५०६ अंतर्गत एक दखलपात्र गुन्हा आहे. यासाठी दोन वर्षांपर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात. जर धमकी गंभीर स्वरूपाची असेल, तर शिक्षा सात वर्षांपर्यंत वाढू शकते. शांतता भंग करण्याच्या उद्देशाने अपमान करणे: एखाद्या व्यक्तीचा अपमान करून त्याला सार्वजनिक शांतता भंग करण्यास प्रवृत्त करणे, हे भारतीय दंड संहिता कलम ५०४ नुसार गुन्हा ठरते आणि यासाठी दोन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते.न्यायालयांची भूमिका आणि सामाजिक जबाबदारी सर्वोच्च न्यायालय आणि विविध उच्च न्यायालयांनी वेळोवेळी सोशल मीडियाच्या गैरवापराबद्दल चिंता व्यक्त केली आहे. मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, ''सोशल मीडिया लोकशाहीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे, पण त्याचा गैरवापर टाळला गेला पाहिजे.'' सर्वोच्च न्यायालयाने देखील सोशल मीडियावरील आक्षेपार्ह टीका-टिप्पणी करणाऱ्यांवर कारवाई करण्याच्या गरजेवर भर दिला आहे. ''आपल्या महान नेत्यांनी आणि दैवतांनी आपल्याला सहिष्णुता आणि करुणेची शिकवण दिली आहे. त्यांच्या नावाचा वापर करून समाजात द्वेष पसरवणे किंवा कोणाला इतके हतबल करणे की तो आपले जीवन संपवेल, हा त्या महान व्यक्तींचाच अपमान आहे. लोकांनी कोणतीही घटना घडल्यास त्यावर त्वरित आणि टोकाची प्रतिक्रिया देण्याऐवजी संयम बाळगला पाहिजे आणि कायदेशीर प्रक्रियेवर विश्वास ठेवला पाहिजे. या प्रकरणात पोलिसांनी सहा संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे, ही एक योग्य कायदेशीर कारवाई आहे. 'नोटरी असोसिएशन, जालना' या घटनेचा तीव्र निषेध करते आणि पीडित कुटुंबाच्या दुःखात सहभागी आहे. आम्ही प्रशासनाकडे मागणी करतो की, या प्रकरणाचा जलदगतीने तपास करून दोषींना कठोर शिक्षा केली जावी, जेणेकरून भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही.

## थोडक्यात



### कळमनुरीत दाती ब्रिजवर ट्रकच्या इंजिनला अचानक आग

कळमनुरी । प्रतिनिधी

कळमनुरी तालुक्यातील दाती ब्रिजवर दिल्लीहून चेन्नईकडे जात असलेल्या ट्रक (१४३०३७) च्या इंजिनला अचानक आग लागली. ही घटना शनिवारी (दि. ८) सायंकाळी घडली.चालक हेमंत कुमार राजेंरा, रा. जिल्हा बुलंदशहर, उत्तर प्रदेश यांनी सांगितले की ट्रकमध्ये १०० फ्रिज चेन्नईकडे नेण्यासाठी भरलेले होते. घटना कळताच, आखाडा बाळापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विष्णुकांत गुट्टे, पोलीस उपनिरीक्षक गोणारकर, जमादार शिवाजी पवार आणि इतर पोलीस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी महामार्गावर वाहतूक सुरळीत केली आणि नांदेडकडे जाणारी वाहने पर्यायी मार्गावर वळवली. महामार्ग प्राधिकरणाला घटना कळवली असता, जरोडा पथकर नाक्यावर अग्निशमन दलाची गाडी उपलब्ध नसल्याचे आढळले. त्यामुळे कळमनुरी नगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्या मदतीने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न सुरू केला. आग नियंत्रणात येत नसल्याने अर्धापूर येथील अग्निशमन दलाची मदत घेऊन ट्रकवरील आग पूर्णपणे आटोक्यात आणली गेली. पोलिसांनी म्हटले की, जर पथकर नाक्यावर अग्निशमन वाहन उपलब्ध असते, तर नुकसान अधिक कमी केले जाऊ शकले असते.

### लग्नाचे आमिष देत तरुणीवर अत्याचार; आरोपी अटकेत

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

मित्राच्या भावाने ओळख करून घेत लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी २४ वर्षीय तरुणीने मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी आरोपी प्रणव प्रभाकर कस्तुरे (२१, रा. मुकुंदवाडी) यास अटक केली आहे. न्यायालयाने त्यास तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. ही घटना जानेवारी २०२५ ते एप्रिल २०२५ या दरम्यान घडली आहे. पीडितेची आरोपीशी ओळख त्याच्या मित्रामार्फत झाली. त्यानंतर प्रणवने तिला हॉटेलमध्ये भेटण्यासाठी बोलावून माझे तुझ्यावर प्रेम आहे, आपण लग्न करू असे सांगत जबरदस्तीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर एप्रिलमध्ये पुन्हा त्याने हाच प्रकार केला. पीडितेने लग्नाबाबत विचारणा केली असता प्रणव सातत्याने टाळाटाळ करू लागला. नंतर तिच्या लक्षात आले की, आरोपीचे दुसऱ्या महिलेसोबत प्रेमसंबंध सुरू आहेत. पीडितेने हा प्रकार प्रणवच्या घरी जाऊन सांगितल्यावर त्याच्या आईने येथे राहू नका, निघून जा अशी धमकी दिली. त्यानंतर प्रणवने पीडितेला फोन करून शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर पीडितेने थेट मुकुंदवाडी पोलिस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून आरोपीला अटक केली असून, पुढील तपास उपनिरीक्षक शिवाजी घोरपडे करीत आहेत.

### रुपयाच्या उचलीसाठी 'हवा सोड' आंदोलन

परभणी। प्रतिनिधी

युवा नेते डॉ. अंकुश लाड यांच्या नेतृत्वाखाली शहरातील तब्बल २२ नेते आणि प्रभावशाली कार्यकर्त्यांनी परभणी येथे झालेल्या कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात (अजित पवार गट) प्रवेश केला. जिल्हाध्यक्ष आमदार राजेश विटेकर यांच्या नेतृत्वाखाली आणि राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. या कार्यक्रमात राणी अंकुश लाड यांची नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी जाहीर करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेल्यात शहरातील प्रकाश पोरवाल, गिरीश कत्रुवार, बाळासाहेब मोरे, सुरेश काबरा, गणेश कुमावत, मोहन लाड, संजय बांगड, डॉ. राजेश्वर दहे, अँड. किरण बारहाते, राजू खरात, राजेश वासुंबे, कविता धबडगे, अभिषेक अळसपुरे, किशोर लाड, दत्ता चौधरी, विनोद राहाटे, बाजीराव हळनोर, नियामत खान, अ. रहीम अ. करीम, सय्यद जमील, स्वप्निल शिंदे आणि गणेश उगले यांचा समावेश आहे. तसेच सदरील निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट हा स्वबळावर लढणार असल्याचे समजते.

## जो जगाला प्रकाशित करतो तो भगवंत आहे-हनुमंत शास्त्री

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील पाटोदा येथील सप्ताहात तिसऱ्या दिवशी हरी किर्तनाचे पुष्प गुंफत असताना हभप हनुमंत महाराज शास्त्री यांनी देव पाहो देव पाहो । उंचे ठायीं उभे राहो । देव देखिला देखिला । तो नाही कोणा भ्याला संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या पांच चरणाच्या अभंगावर श्रोत्यांना विवेचन करतांना ते बोलत होते. या मंगलमयी प्रसंगी किर्तनाला साथसंगत देण्यासाठी गुणिजन गायनाचार्य हभप पांडुरंग महाराज भोसले, हभप पवन महाराज कदम आणि हभप अंशीराम महाराज चव्हाळ यांनी आपल्या रसाळमय वाणीतून साथ दिली तर मृदंगाचार्य हभप सनतकुमार महाराज.इदगे, हभप मनोज महाराज माने या आळंदी



येथील गुणीजनांनी सुरेल साथ दिली त्यांच्या गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. या अभंगावर विवेचन करत असताना शास्त्री महाराज पुढे बोलत असताना म्हणाली की भगवंत हा स्वयंप्रकाशित आहे पण त्याची एक अट आहे जीवानं मला पाहण्याचा प्रयत्न करावा मी त्याला दिव्यदृष्टी प्रदान करतो एकदा का जीवाने पाहिले की जीव निर्भय होतो निर्भयता आणि देव या दोन शब्दांवर त्यांनी प्रखर विवेचन केले. यावेळी हभप महादेव महाराज इरळदकर आवर्जून उपस्थित होते. या अगोदर दुपारच्या सत्रात प्रख्यात भागवताचार्य हभप अशोक महाराज इदगे यांनी श्रीमद्भागवत कथा सांगत असताना परीक्षेत राजाचा उद्धार, शुक्राचार्यांनी शरणांगती पत्करल्यामुळे झाला.तसेच मानवाने कोणाचीही शरणागती करावी. शरण जाण्यास मानव चुकला तर त्याचे जीवन उद्ध्वस्त होते असे अनेक उदाहरणे देऊन अध्यात्मिक, सामाजिक या विषयावर विवेचन केले . भागवत कथे नंतर हरीपाठ झाल्यानंतर ग्रामस्थांच्या वतीने महापंगतीचे आयोजन करण्यात आले.भाविकांनी या प्रसादाचा लाभ घेतला.

## जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी घेतला जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा



जालना । प्रतिनिधी

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील योजनानिहाय अर्थसंकल्पीय तरतुदी सर्व कार्यान्वयीन यंत्रणांना कळविलेल्या आहेत. जिल्ह्यातील बऱ्याच कार्यालयीन यंत्रणांनी तांत्रिक मान्यतेचे प्रस्ताव सादर केले नसल्याचे प्रथम दर्शनी दिसून आले आहे. तरी संबंधित यंत्रणांनी तांत्रिक मान्यता तत्परतेने घेवून, तसेच प्रशासकीय मान्यता घेवून कामे विहीत मुदतीत पुर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना दिले. जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात आज जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) वर्ष २०२५-२६ करीता आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह संबंधित यंत्रणेच्या कार्यालय प्रमुखांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी यांनी जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा घेताना विविध कामांच्या प्रगतीचा, खर्चाच्या स्थितीचा आणि मंजूर निधीच्या वापराचा सविस्तर आढावा घेतला आहे. त्यांनी संबंधित शासकीय विभागांना मंजूर निधी वेळेत खर्च करण्याचे निर्देश दिले. प्रत्येक विभागाने मंजूर निधी आर्थिक वर्षातच खर्च करावा, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता त्वरीत मिळवावी, तसेच कामांची गुणवत्ताही चांगल्या प्रतीची असावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या. यावेळी वन विभाग, कौशल्य विभाग, क्रीडा विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महिला व बाल कल्याण विभाग, मृद व जलसंधारण विभाग, उर्जा विभाग, उद्योग विभाग, उपप्रादेशिक परिवहन विभाग, लघु पाटबंधारे विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, राज्य पुरातत्व विभाग, कारागृह विभाग, शिक्षण विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, नगरपालिका प्रशासन विभाग, सिंचन विभाग, आणि रस्ते विभागाच्या तांत्रिक व प्रशासकीय मान्यता बाबत सविस्तर आढावा घेवून विविध सुचना करण्यात आल्या. जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ नियोजनाबाबत दायित्व वजा जाता दीडपट प्रशासकीय मान्यता/प्रस्ताव आदीचा आढावा घेण्यात आला.

## बुद्ध विहार येथे शाळा प्रवेश दिन साजरा

अंबड । प्रतिनिधी

ज्ञान भूमी बुद्ध विहार महात्मा फुले नगर अंबड येथे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा ७ नोव्हेंबर शाळा प्रवेश दिन उत्साहात साजरा करण्यात आला .सर्वप्रथम भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व भगवान बुद्ध यांच्या प्रतिमेस उपस्थित त्यांनी अभिवादन केले . भंते राजरत्न यांनी उपस्थि त्यांना त्रिसरण पंचशील दिले. महात्मा फुले नगर येथील अभिजीत खरात व श्रेया खरात यांच्या हस्ते भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पमाला घालण्यात आली .याप्रसंगी भारतीय बौद्ध महासभा जालना जिल्हा महिला अध्यक्ष ज्योतीताई खरात उपस्थित होत्या.

अंबड तालुका अध्यक्ष उत्तमराव



येडे, सरचिटणीस डॉक्टर राहुल बागुल, आयुष्यमान रामदासजी वाढवे ,प्राध्यापक डॉक्टर रमेश जी जोगदंड ,आयुष्यमान प्रकाश घायतडक सर ,आयुष्यमान अचित राव उघडे सर, लताताई रुपवते ,नर्मदाबाई खरात ,रेखाताई जाधव ,पटेकर आई ,बाल बालिका प्रसंगी उपस्थित होत्या .उपस्थित मुला मुलींना पेन व गुलाब पुष्प , केळी देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले .प्राध्यापक जोगदंड सरांनी लहान मुलांना बाबासाहेबांचे प्रेरणादायी विचार सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भारतीय बौद्ध महासभा अंबड शाखेचे अध्यक्ष आयुष्यमान उत्तमराव येडे सरांनी केले तर सरनातय गाथेने कार्यक्रमाची सांगता झाली.

## पंप मालकानेच पकडली टँकरमधून पेट्रोल चोरणारी टोळी

लातूर। प्रतिनिधी

अनेक वर्षांपासून महामार्गावर खुलेआमपणे चालणाऱ्या पेट्रोल-डिझेल टँकर मधून चोरीच्या गोरखधंद्याचा पंप मालकाच्या सतर्कतेमुळे पर्दाफाश झाला असून याबाबत भादा पोलिसात गुन्हा नोंद करून याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल केला असून दोघांनी अटक केली आहे.

याबाबत माहिती अशी की मुखेड तालुक्यातील एका पेट्रोल पंप मालकाला पेट्रोल - डिझेल टँकर मधून कमी इंधन येत असल्याचा संशय येत होता. त्यांनी याबाबत शहानिशा करण्याचे ठरवले. त्यांनी सोलापूर येथून टँकर भरून निघाल्यानंतर १०० किलोमीटर टँकरचा पाठलाग करून औसा तालुक्यातील येल्लोरी पाटीवर टँकरमधील पेट्रोल-डिझेल चोरी करणाऱ्या टोळीला रंगेहाथ पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. सोलापूर येथील धर्मेंद्र ट्रान्स्पोर्टचा एक टँकर (क्र. एम एच १३ सीयू २४३५) मुखेड तालुक्यातील महालक्ष्मी पेट्रोल पंपासाठी पेट्रोल घेऊन सोलापूरहून औसा मार्गे निघाला होता.

टँकर चालक पिंटू जगन्नाथ वर्मा आणि मुखेड येथील पंप व्यवस्थापक ज्ञानेश्वर मारोती नरवाडे यांनी संगनमत केले. टँकर चालक वर्मा आणि व्यवस्थापक नरवाडे यांनी विश्वासाने सोपवलेल्या टँकरमधील पेट्रोलची चोरी करण्यासाठी औसा येथील येल्लोरी पाटीवर टँकर थांबवले. याच दरम्यान, पंप मालक भगवानराव पाटील यांनी संशयावरून डेपोपासूनच टँकरचा पाठलाग सुरू केला होता. १०० किलोमीटरपर्यंत टँकरचा पाठलाग केल्यानंतर त्यांना येल्लोरी पाटीवर टँकरमध्ये गेल्याचे दिसले. पाटील आत गेले असता टँकरमधून अंदाजे ६० लिटर पेट्रोल सुमारे (६३०० रुपये) काढून घेताना चे संपूर्ण प्रकाराचे चित्रीकरण केले आणि व्यवस्थापक नरवाडे व टोळीला पाटील यांनी याला पकडून भादा पोलीस ठाण्यात आणले. वर्षानुवर्षे महामार्गालगतच्या पाटीवर हा अवैध धंदा बिनधास्तपणे सुरू होता. हा गोरखधंदा सर्वांच्या सहकार्याने चालत असून, जागोजागी टोळ्या सक्रिय असल्याने बिनधास्तपणे पंप मालकाची लूट केली जात आहे, अशी माहिती भगवानराव पाटील यांनी दिली. ट्रान्स्पोर्ट चालकाच्या फिर्यादीवरून भादा पोलिसांनी टँकर चालक वर्मा, पंप व्यवस्थापक नरवाडे आणि इतर तीन अज्ञात आरोपींविरुद्ध भादंविच्या संबंधित कलमांनुसार बीएनस ३१६, (३) ३ (५) नुसार) गुन्हा दाखल केला आहे. फौजदार पुरी या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.



## भाजपकडे उमेदवार जास्त असल्यामुळे बंडखोरी होण्याची शक्यता?

अंबड/प्रतिनिधी

अंबड नगर परिषद निवडणूक जशी तशी निवडणूक जवळजवळ येत आहे. तशी चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. अध्यक्ष कोण याची पण चर्चा शहरात सुरू आहे. परंतु भाजपकडून जुन्या कार्यकर्त्यांना डावलून नवीन ना संधी देण्याचा दिसून येत परंतु असे झाले तर भाजपची मोठी नुकसान होण्याची शक्यता आहे असे पण काही तज्ञकडून बोलल्या जात आहे. ज्यांनी भाजप पक्षासाठी एकनिष्ठ राहून पक्षाची वाढ केली. त्याच कार्यकर्त्याला पक्षमधून दूर ठेवण्याचा कार्यक्रम सुरू असल्याचे बोलल्या जात आहे. भाजपमध्ये यामुळेच बंडखोरी व पक्षप्रवेश होण्याची शक्यता आहे असे पण मनाला हरकत नाही.आगामी नगर परिषदेचे




निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अंबड शहरात राजकीय वातावरण तापू लागले असून विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी अंबड नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. राज्य निवडणूक आयोगाने नगर परिषदेच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला असून १० ते १७नोव्हेंबरपर्यंत उमेदवारांना अर्ज दाखल करता येणार आहे.

अंबड नगर परिषदेत एकूण सदस्य संख्या २२ असून ११ जागा महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित जातीसाठी २, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी ६, सर्वसाधारण महिलांसाठी ७ जागा आरक्षित आहेत. २०११ च्या जनगणनेनुसार अंबड शहराची लोकसंख्या ३१ हजार ५३३ आहे. आगामी निवडणुकीसाठी अंबड शहरातील २९ हजार ६५९ मतदार मतदान करणार आहेत. प्रशासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या मतदार यादीवर प्रभागांतील आरक्षण प्रभाग क्रमांक १० ओबीसी महिला राखीव, प्रभाग क्रमांक २ - अनुसूचित जाती सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ३- सर्वसाधारण महिला राखीव, प्रभाग क्रमांक ४ - ओबीसी महिला, प्रभाग क्रमांक ५ - अनुसूचित जाती महिला, प्रभाग क्रमांक ६ - ओबीसी महिला, प्रभाग क्रमांक ७- ओबीसी महिला, प्रभाग क्रमांक ८- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक ९- सर्वसाधारण महिला, प्रभाग क्रमांक १०-अनुसूचित जाती महिला, प्रभाग क्रमांक ११ -ओबीसी महिलांचा समावेश आहे. मोठ्या प्रमाणात आक्षेप नोंदविण्यात आले होते. सर्व आक्षेपावर सुनावनीनंतर अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात आली. अंबड नगरपालिकेत काही वर्षापूर्वी वत्सला ठाकूर (भाजप), सुलभा कुलकर्णी (काँग्रेस), मंगल कटारे (राष्ट्रवादी काँग्रेस), संगीता कुचे (भाजप) या महिलांनी अध्यक्षपद भूषविले आहे. २००२५ या निवडणुकीमध्ये आता कोणाच्या गळ्यात अध्यक्ष पदाची ची माळ पडणार आहे याची उत्सुकता लागली आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
सोमवार दि. १० नोव्हेंबर २०२५


# बळजबरीने पिक कापणी करणाऱ्यांची दिंद्रुड पोलीसांकडून पाठराखण

## इच्छा मरणास परवानगी द्या-पोलीस अधीक्षकांकडे देवळेंची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोगरा येथील गट नंबर ३३२मधील १०एकर क्षेत्रातील उभ्या असलेल्या बाजरी पिकात गुर-ढोर सोडुन पिक चारुन नुकसान करून काढणीला आलेले सोयाबीन पीकाची जबळजबरीन कापणी करणाऱ्या हरिभाऊ लालसिंग चव्हाण, विजय हरिभाऊ चव्हाण, अर्जुन हरिभाऊ चव्हाण,सतिष प्रल्हादराव देवळे ,नरेश प्रल्हादराव देवळे, देवळे सर्व रा.मोगरा,ता.माजलगाव हे संगनमताने करत आहेत. याची तक्रार जमीन मालक प्रशांत यशवंतराव देवळे यांनी लेखी माहिती दिंद्रुड पोलीस ठाण्यात ६ नोव्हेंबर रोजी दिली होती. पण तेथील ठाणे प्रमुखांनी हेतुपुरस्सर दुर्लक्ष केल्याने त्यांच्या पाठराखण मुळे उपरोक्त नमुद नामे व्यक्तींचे मनोबल वाढले आहे म्हणुन नैराश्य आले असुन आत्महत्येची वेळ आली असल्याने इच्छा मरणाची परवानगी देण्यात यावी या मागणीचा अर्ज ७ नोव्हेंबर रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक, बीड यांना देण्यात आला आहे.

प्रशांत देवळे यांनी दिलेल्या अर्जात उल्लेखीत बाबी सह नमुद केले आहे की, सदरच्या मालकीच्या जमिनीवर माजलगाव दिवाणी न्यायालय, उच्च न्यायालय, औरंगाबाद/छत्रपती संभाजी नगर,सर्वोच्च न्यायालय, तहसीलदार माजलगाव यांच्या आदेशानुसार खरीपाची पेरणी केली होती आणि शांतता व कायदेशीर मार्गाने जमीनीचा उपभोग घेत आहे. पण उपरोक्त उल्लेखीत व्यक्ती सतत वहिवाटीस हरकत करत आहेत व शेतात काम करणाऱ्या मजुरांना हाणामारी करून दडपशाहीच्या घटना घडल्या होत्या त्या बाबतीत दिंद्रुड पोलीस ठाण्यात गुरनं.१९२/२०२५वरून संबंधित व्यक्तीं विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले होते. पण तरीही दिंद्रुड पोलीस त्यांच्या विरोधात कठोर कारवाई करत नाहित आणि वेळेवेळी कोर्ट कार्यवाहीचे कागदपत्रे सादर करा वगैरे म्हणत त्यांची पाठराखण करत आहेत. वरील व्यक्तीं पासुन जीवाला धोका निर्माण झाल्याने प्रशांत देवळे यांनी १३/१०/२०२५ रोजी जिल्हा पोलीस अधीक्षकांना अर्ज दिला होता की, नमुद गट नंबर मध्ये ४हेक्टर क्षेत्रफळ जमीनी मधील सोयाबीन काढण्या करीता व वहिती ◀◀ पान ३ वर

# चुकीचे आरोप करून ओबीसी नेत्यांना संपविण्याचे कट कारस्थान तात्काळ थांबवा! - अॅड.राऊत

बीड । प्रतिनिधी

ओबीसी समाजाच्या हक्काच्या आरक्षणासाठी उघडपणे बोलणाऱ्या ओबीसी नेत्यांवर चुकीचे आरोप करून त्यांचे राजकीय, सामाजिक अस्तित्व संपवण्याचा प्रयत्न करणाऱ्या स्वयंघोषित नेत्यांनी स्वतःचे चारित्र्य तपासून दुसऱ्यांवर आरोप करण्यापूर्वी आपल्या आयुष्यात किती अंधार आहे याचा तपास करावा, स्वतःच्या संरक्षणासाठी समाजाचा आधार घेणाऱ्यांनी समाजाचे रक्षण करणाऱ्या नेत्यांवर आरोप करणे म्हणजे सूर्यावर गरळ ओकण्यासारखे आहे. आ. धनंजय मुंडे यांच्यावर अंधाधुंद आरोप करताना आरोप करणाऱ्याने स्वतःची पिलावळ सांभाळणे महत्त्वाचे आहे. कार्यकर्ते तुमचे, तुम्हाला देव मानतात, मग तुमच्या विरोधात कट कारस्थान रस्तात कसे? याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. अगोदर स्वतःचे पाय मुळे तपासा नंतरच ओबीसी नेत्यांवर आरोप करावेत. ओबीसी नेत्यांना संपविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी अगोदर स्वतः किती चारित्र्यवान आहेत हे तपासावे असे खुले आवाहन अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांनी केले आहे.



गेल्या दोन वर्षापासून ओबीसी समाजातील नेत्यांचे सामाजिक, राजकीय खच्चीकरण करण्याचा प्रयत्न जातीवादी लोकांकडून होत आहे. मात्र अशा लोकांच्या भूलथापांना न डगमगता ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनरावजी भुजबळ साहेब ,आ. धनंजय मुंडे, ओबीसी समाजाचे हक्कासाठी सर्वतोपरी लढाई लढत आहेत. मात्र काही विघ्न संतोषी लोक या ओबीसी नेत्यांचे राजकीय, सामाजिक चारित्र्यहरण करण्याचा केविलवाना प्रयत्न करीत आहेत. या लोकांनी अगोदर स्वतःचे चारित्र्य तपासून पहावे नंतरच ओबीसी नेत्यांना लक्ष करावे असा सल्ला ड. सुभाष राऊत यांनी दिला आहे.

# शिवसेनेने आदेश दिल्यास लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कलची निवडणूक लढवणार- उपजिल्हाप्रमुख उगले

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथरावजी शिंदे साहेब व संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात शिवसेना पक्ष शिवसेनेचा भगवा झेंडा स्थानिक स्वराज्य संस्थांवर फडकवण्यासाठी शहर महानगर व जिल्हा पदाधिकारी मेहनत घेत आहेत. लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कल हे शिवसेनेला व धनुष्यबाणाला मतदान करणारे स्वाभिमानी सरकल आहे. या सर्कलचे शिवसेनेचे दिवंगत जिल्हाप्रमुख विजय अण्णा बहिर, मकरंद भाऊ उबाळे यांच्यासह पंचायत समितीच्या दोन्ही गणांमध्ये सुद्धा शिवसेनेच्या अनेक कार्यकर्त्यांनी विजयाचा गुलाल उधळलेला आहे. शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख चंद्रकांत आप्पा नवले,जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात आता होऊ घातलेल्या नगर परिषदेच्या व नगरपंचायत च्या निवडणुका तसेच आगामी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका लढवल्या जाणार आहेत. शिवसेनेचे जिल्ह्याचे सर्व पदाधिकारी विजयासाठी आणि शिवसेनेच्या भगव्यासाठी एक दिलाने काम करणार आहेत. आपल्या सामाजिक व राजकीय कार्याचा गौरव म्हणून शिवसेना पक्षाने आदेश दिल्यास लिंबागणेश जिल्हा परिषद सर्कल मध्ये निवडणूक लढवू असा विश्वास शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख व बीड मार्केट कमिटीचे संचालक गणेश उगले यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केला आहे.



लिंबागणेश सर्कल मध्ये व ग्रामीण व शहरी भागामध्ये कोरोना सारख्या जागतिक महामारीच्या संकटामध्ये रुग्णांना उपचार मिळवून देण्यापासून ते अडचणी त असणाऱ्या कुटुंबाला किराणा किट वाटप करण्यापर्यंतचे सर्व विधायक कामे आम्ही बीड जिल्हा शिवसेनेच्या माध्यमातून केलेली आहेत. शिवाय उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या २०२२ ते २०२४ या मुख्यमंत्री पदाच्या काळात अनेक विकासाची कामे कार्यकर्त्यांना सोबत घेऊन गावासाठी केलेली आहेत. भविष्य काळामध्ये सुद्धा लिंबागणेश सर्कलला ◀◀ पान ३ वर

# धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक बदनामी न थांबवल्यास राज्यभर आंदोलन

बीड । प्रतिनिधी

राज्याचे नेते माजी मंत्री आ धनंजय मुंडे यांची विनाकारण बदनामी सुरू केली असून आज सकल ओबीसी समाजाच्या वतीने बीड शहरातील पवनसुत मंगल कार्यालय परिसरात धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक घालण्यात आला मुंडे साहेबांची बदनामी थांबवली नाही तर महाराष्ट्रभर त्याचे परिणाम भोगावे लागतील याला जबाबदार शासन असेल असा इशारा ओबीसी समाजाच्या वतीने देण्यात आला.



ओबीसी नेतेमाजी मंत्री आ धनंजय मुंडे यांची जाणीवपूर्वक काहींनी बदनामी सुरू केली आहे मनोज जरांगे यांना जिवे मारण्याच्या कटात त्यांचा सहभाग असल्याचा आरोप केला गेला आहे यासोबतच त्यांच्याविषयी वंजारी समाजाविषयी अवमानकारक आणि चितावणीखोर भाषा वापरली जात आहे याचा निषेध करत आज बीड शहरातील ओबीसी समाजाच्या वतीने माऊली शिरसाट ,मोहन आघाव, केशव तांदळे, ढाकणे तांदळे, सिरसाट, बंटी बांगर मधुकर खाडे ,हरीश साळी यांच्यासह असंख्य ओबीसी समाजातील बांधवांनी आमदार धनंजय मुंडे यांच्या प्रतिमेचा दुग्धाभिषेक घातला व धनंजय मुंडे यांचा विजय असो ओबीसी एकजुटीचा विजय असो अशा घोषणा दिल्या यावेळी बोलताना आंदोलकांनी धनंजय मुंडे यांची बदनामी थांबवली नाही तर याचे पडसाद महाराष्ट्रभर उमटतील उद्या महाराष्ट्र मध्ये जर काही घडले तर त्याला प्रशासन आणि राज्य शासन जबाबदार राहील असा इशारा दिला आहे या आंदोलनामुळे नगर रोडवरील वाहतूक काही वेळ ठप्प झाली होती.

# आष्टीत पत्रकार गहिनीनाथ पाचबैल आणि प्रा.निसार शेख यांचा सत्कार

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी येथील शासकीय विश्रामगृहात शनिवारी झुंजार नेताचे झुंजार पत्रकार तथा मागिल अनेक वर्षापासून पत्रकार क्षेत्रात नावलौकीक मिळवलेले गहिनीनाथ पाचबैल यांची मराठी पत्रकार परिषद संलग्न आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या सचिवपदी नुकतीच निवड झाल्याबद्दल, तसेच मागिल २५ वर्षापासून कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा येथे ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत असलेले प्राध्यापक तथा पत्रकार निसार शेख यांना लोकशक्ती महाराष्ट्र गौरव 'आदर्श प्राध्यापक' पुरस्कार मिळाल्याबद्दल दोन्ही



पत्रकार बंधूंचा सत्कार दैनिक झुंजार नेताचे संपादक अजित वरपे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा उपाध्यक्ष तथा आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, दैनिक झुंजार नेताचे व्यवस्थापक राहुल जामकर, पत्रकार दिगंबर बोडखे, माजी सरपंच विठ्ठल राख, आदर्श शिक्षक कल्याण वाल्हेकर, पत्रकार राजेंद्र लाड, संतोष नागरगोजे, सचिन पवार, सिराज सय्यद आदी यावेळी उपस्थित होते.

# ओंकार (वैद्यनाथ) साखर कारखान्याच्या गळीत हंगामाचा आज ना. पंकजाताई मुंडेंच्या हस्ते शुभारंभ

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

ओंकार (वैद्यनाथ कारखाना) साखर कारखान्याच्या बॉयलर प्रदीपन आणि गळीत हंगामाचा शुभारंभ उद्या १० नोव्हेंबर रोजी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होत आहे.

ना. पंकजाताई मुंडे उद्या परळीत येत असून दुपारी २ वा. त्यांचे गोपीनाथ गड येथे हेलिकॉप्टरने आगमन होणार आहे. ओंकार साखर कारखाना प्रा. लि. युनिट क्रमांक ८ या कारखान्याचा बॉयलर प्रदीपन व गळीत हंगामाचा शुभारंभ दुपारी २.१५ वा. त्यांच्या हस्ते व ओंकारचे चेअरमन बाबुराव बोत्रे पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे. या कार्यक्रमास ऊस उत्पादक शेतकरी, सभासद, सर्व संचालक व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन कारखान्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# पवारांचे खंदे समर्थक विठ्ठल पवार व समाधान मस्के राष्ट्रवादीत डेरे दाखल

गेवराई । प्रतिनिधी

नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहिर होताच गेवराई भाजपाला मोठी गळती लागली आहे, लक्ष्मण पवारांचे खंदे समर्थक म्हणुन ओळख असलेले माजी नगरसेवक विठ्ठल पवार आणि समाधान मस्के या दोहोंनी त्यांच्या असंख्य समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश केला. एकेकाळी भाजपाचा अभेद्य बुरुज अशी ओळख असलेल्या शिवाजीनगर मध्ये भाजपाला खिंडार पडुन भाजपाचा शिवाजीनगर बुरुज ढासळला असल्याची चर्चा गेवराई शहरात सुरु आहे. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वात झालेल्या प्रवेश सोहळ्याला शिवाजीनगर भागातील



नागरीक आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. विजयसिंह पंडित यांनी समाधान मस्के व त्यांच्या समर्थकांचे राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये स्वागत केले आहे.

गेवराई नगर परिषद निवडणुकीच्या पहिल्या टप्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये जोरदार इनकमिंग सुरु झाले आहे. शनिवार दि. ८ नोव्हेंबर रोजी शिवाजीनगर भागात माजी आमदार लक्ष्मण ◀◀ पान ३ वर

# बीड येथे शिक्षकांची राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा

बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शाळा प्रवेश दिनानिमित्त नालंदा फाऊंडेशन, बीड यांच्या वतीने आयोजित दुसरी राज्यस्तरीय शिक्षक वक्तृत्व स्पर्धा रविवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे उत्साहात पार पडली.

या स्पर्धेचे उद्घाटन स्वा.सावरकर महाविद्यालयाचे उपप्राचार्य, प्रा.डॉ. उत्तम साळवे यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी बोलताना त्यांनी सांगितले की, या वक्तृत्व स्पर्धेचा हेतू केवळ बोलणे नाही, तर



**डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळा प्रवेश दिनानिमित्त नालंदा फाउंडेशनतर्फे स्पर्धेचे आयोजन; महाराष्ट्रभरातून शिक्षकांचा उत्स्फूर्त सहभाग**

मूल्यांची जपणूक करणे आहे. बाबासाहेबांचे जीवन म्हणजे विचारांचा आणि संघर्षाचा दीपस्तंभ आहे. त्यांनी महात्मा फुले यांच्या अधुर्या कार्याला नवी दिशा दिली. प्रत्येक शिक्षकाने त्या विचारांचा वारसा जपून समाज परिवर्तनाच्या प्रवासात आपले योगदान दिले पाहिजे.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा.प्रदीप रोडे (अध्यक्ष, नालंदा फाउंडेशन) यांनी भूषवले. प्रमुख अतिथी म्हणून प्रा.डॉ.धम्मपाल घुंबरे (कालिकादेवी महाविद्यालय, शिरूर का.), प्रा. अर्जुन राठोड (संचालक, अचिव्हर्स अकॅडमी) आणि प्रा.राम गायकवाड (सहसंयोजक, नालंदा फाउंडेशन)उपस्थित होते. मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, शिक्षकांनी समाजपरिवर्तनाच्या प्रवाहात प्रेरणादायी भूमिका पार पाडावी, असे विचार व्यक्त केले. राज्यभरातील विविध जिल्ह्यांतील शिक्षकांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. स्पर्धा ◀◀ पान ३ वर

# राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या रात्री उशिरापर्यंत मुलाखती

## नगराध्यक्ष व नगरसेवक पदासाठी अनेकांची रस्सीखेच

बीड । प्रतिनिधी

शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयात रविवारी (दि.९) नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नगरसेवक व नगराध्यक्ष पदासाठी दोनशेहून अधिक इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. सकाळी १० वाजता सुरू झालेल्या या मुलाखती रात्री उशिरापर्यंत सुरूच होत्या. पक्षाला मिळालेला हा उत्स्फूर्त प्रतिसाद आगामी निवडणुकीत पक्षाची ताकद दाखवणारा ठरला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हेच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने त्यांचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवर विशेष लक्ष असणार आहे. नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे यांनी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेऊन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पक्षाच्या मुलाखत मंडळात जिल्हाध्यक्ष अॅड.राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, अशोक हिंगे, फारूक पटेल यांचा समावेश होता. या मंडळासमोर रात्री उशिरापर्यंत नगरसेवक पदासाठी दीडशेहून अधिक तर नगराध्यक्ष पदासाठी ३५ इच्छुक उमेदवारांनी मुलाखती दिल्या. याप्रसंगी महिला आघाडी जिल्हाध्यक्ष अॅड.प्रज्ञा खोसरे, तालुकाध्यक्ष अॅड.राजेंद्र राऊत, कार्यालय चिटणीस महादेव धांडे यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पक्ष कार्यालय परिसरात तोबा गर्दी

**मित्रनगर चौकातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यालयासमोर इच्छुक उमेदवार व कार्यकर्त्यांची तोबा गर्दी झाली होती. रात्री उशिरापर्यंत मुलाखती सुरूच होत्या, ही प्रक्रिया संपवून जिल्हाध्यक्ष अॅड.राजेश्वर चव्हाण हे पक्षश्रेष्ठींना अहवाल सादर करणार होते.**

# हिमालयाची उत्तुंगता,गंगेची निर्मलता अनंत अशा हिंद सागराची गाज असे वंदे मातरम् गीत -प्रा. देशमुख

आष्टी । प्रतिनिधी

७ नोव्हेंबर १८७५ यादिवशी बंकीमचंद्र चटर्जी यांनी वंदे मातरम् हे गीत कलकत्याजवळील नैहाटी कंटालपाडा या त्यांच्या जन्मगावी लिहले आहे.भातीय स्वातंत्र्य लढ्याता अत्यंत महत्वाचे स्थान मिळविलेल्या या गीताचे आज १५१वे.जन्मवर्षे सुरु होत आहे.भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहिसात या गीताचे मोठे योगदान आहे. माते तुला वंदन असो असा सरळसरळ अर्थ असलेल्या वंदे मातरम् या दोन शब्दांनी इंग्रजाविरुध्द लढलेल्या भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा संपुर्ण इतिहास बदलला,इतिहास घडविला आहे.

हिमालयाची उत्तुंगता,गंगेची निर्मलता अनंत अशा हिंद सागराची गाज अशा उपमा ज्या गीतास लागु पडतील असे हे गीत भारत राष्ट्राच्या जडणघडणीत अनेक व्यक्तीच्या, संघटनांच्या कर्तृत्वाचेमोठे योगदान असल्याचे प्रतिपादन प्रा.डा. सुपर्णा देशमुख यांनी केले.

राष्ट्रगीत 'वंदे मातरम्'च्या १५० व्या. वर्षपूर्तीनिमित्त, भारतमातेच्या स्तुतीचा गौरवदिन व वंदे मातरम् गीताचे सामुहिक गायन आणि देशभर साजऱ्या होणाऱ्या वर्षभराच्या उत्सवाचा शुभारंभ आष्टी तालुक्यातील पंचायत समिती प्रांगणात उत्साहात झाला.यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने हे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून आष्टीच्या तहसीलदार वैशाली पाटील या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून गटशिक्षणाधिकारी सौ.सीमा काळे,



तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, श्री गुरूलिंग स्वामी जिबकाटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या श्रीमती नागरगोजे मडम, सहाय्यक पोलीस निरीक्षक नानासाहेब सुर्यवंशी,पोलीस उपनिरीक्षक कृष्णा शिंदे, व्याख्यानकार डॉ.सुपर्णा देशमुख, कल्याण पोकळे, पत्रकार उत्तम बोडखे,अविनाश कदम,शरद रेडेकर, शरद गर्जे राजेंद्र लाड,कवी हरिश हातवटे,कैलास रेडेकर फौजी, विस्तार अधिकारी एन.डी.शिंदे,अजय निंबाळकर, जायभाये आदी मान्यवर उपस्थित होते.

डा.सुपर्णा देशमुख पुढे म्हणाल्या की , 'वंदे मातरम्' या गीताच्या स्वातंत्र्य चळवळीतील भूमिकेकडे लक्ष वेधले.भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी २४ जानेवारी १९५० रोजी संविधान सभेला संबोधित करताना म्हटल्याप्रमाणे, स्वातंत्र्य लढ्यात या गीताची महत्त्वपूर्ण भूमिका होती म्हणूनच त्याला 'जन-गण-मन' या राष्ट्रगीतासारखाच दर्जा आणि आदर दिला पाहिजे असे त्या म्हणाल्या. तर आजही 'वंदे मातरम्' गीत देशाबद्दलचा अभिमान,प्रेम आणि भक्ती जागृत करते आणि प्रत्येक भारतीयाच्या मनात उत्साह आणि देशभक्तीची लहर निर्माण करते असे सांगत वन्दे मातरम् गीत हे शाश्वत आहे आणि राहील.. कारण हे गीत मातेचा आदरवंदन करणारे गीत आहे.आर्यांच्या अगोदरच्या काळात भारतात मातृसत्ताक पद्धती होती.मातेचे पूजन करण्यास आपल्या वेदांमध्ये प्रमुख स्थान आहे. वंदे मातरम् गीत मातेचे पुजन करणारे गीत आहे.या गीताचा शब्दशः अर्थ समजुन घेतला तर सर्व धर्म समभावास प्रेरित करणारे हे गीत आहे. बंकीमचंद्रांनी आपल्या प्राचीन परंपरेचे भान ठेवत केलेले राष्ट्रचिंतन आहे.या चिंतनातुन समृद्ध देशाचे पाहिलेले स्वप्न आणि या मातृभूमीच्या सर्व पुत्रांमध्ये एकत्वाची भावना ठेवुन समर्पणाचा केलेला निर्धार ही या गीताचे वैशीष्टे आहे.एखादे गीत संपुर्ण राष्ट्राच्या ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बिबट्याची दहशत अन् प्रशासनाचं अपयश, स्वरक्षणासाठी महिलांनी गळ्यात टोकदार खिळ्यांचा पट्टा घातला



**पुणे । प्रतिनिधी**

**उत्तर पुणे जिल्हा हा बिबट्याचा हॉटस्पॉट बनला असून त्याच्या दहशतीन ग्रामस्थ भयभीत झाल्याचं चित्र आहे. आता या बिबट्यापासून स्वत:चं संरक्षण करण्यासाठी ग्रामस्थ वाटेल त्या उपाययोजना करत आहेत. शिरूर तालुक्यातील पिंपरखेड गावच्या महिलांनी तर थेट गळ्यामध्ये टोकदार खिळे असलेला पट्टाच घातलाय. बिबट्या प्रामुख्याने मानेवर हल्ला करुन, नरडीचा घोट घेतो. अशा प्रसंगी शेतात राबताना बिबट्याने आपली शिकार करु नये, म्हणून महिलांनी टोकदार खिळे असलेला पट्टा गळ्यात घातल्याचं चित्र आहे.**

शेती हेचं उपजीविकेचं साधन असल्यानं, शेतात जाण्याविना या शेतकऱ्यांसमोर पर्याय नसतो. पण त्यावेळी बिबट्याच्या हल्ल्यातून जीव कसा वाचवायचा? असा प्रश्न त्यांच्यासमोर उभा ठाकलाय. त्यावर पर्याय म्हणून जसं कुत्र्यांच्या गळ्यात खिळ्यांचे पट्टे घातले जातात, तसे पट्टे घालण्याचा निर्णय या बळीराजाने घेतला आहे.

प्रशासनाचं सपशेल अपयश

राज्य सरकार आणि वनविभाग ग्रामस्थांना संरक्षण देण्यात अपयशी ठरताना दिसत आहे. आतापर्यंत बिबट्याच्या हल्ल्यात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळं बळीराजावर टोकदार खिळ्यांचे पट्टे परिधान करण्याची वेळ आली आहे आणि हे खरंच लाजिरवाणे आहे.

याबाबत बोलताना खासदार अमोल कोल्हे म्हणाले की, कबूतरांच्या बाबत मुख्यमंत्र्यांनी तात्काळ बैठक घेतली होती. पण इकडे बिबट्याने ५७ बळी घेतल्यानंतर सरकारला जाग आली. आम्हाला त्यासाठी रास्तारोको कराव लागलं. आमची मागणी आहे की बिबट्याचा हल्ला हा राज्य आपत्ती घोषित करावा. तसे जर केरळ सरकार घोषित करत असेल मग आपल्या मुख्यमंत्र्यांना काय अडचण आहे?

तिघांचा जीव घेणाऱ्या नरभक्षक बिबट्या ठार

शिरूर तालुक्यातील पिंपरखेड येथे नरभक्षक बिबट्याला ठार करण्यात वन विभागाला यश आलं आहे. रात्री उशिरा गावामध्ये बिबट्याचा शोध घेत असताना वन विभागाला हा बिबट्या ड्रोनमध्ये दिसला. नंतर या बिबट्याला पकडण्यासाठी डार्ट मारण्याचा प्रयत्न केला गेला, डार्ट मिस झाला.

यामुळं सावध झालेल्या बिबट्याने थेट वनविभागाच्या कर्मचाऱ्यांवरती प्रतिहल्ला करण्याचा प्रयत्न केला. मग शेवटी दोन शार्प शूटरने या बिबट्यावरती तीन राऊंड फायर केले, यात बिबट्या ठार झाला. ६ वर्षे वयाचा नर जातीचा हा नरभक्षक बिबट्या आहे. १३ वर्षीय रोहनचा जीव ज्या ठिकाणी घेतला तिथून ४०० मीटर अंतरावर या बिबट्याला ठार करण्यात आलं. हा तोच नरभक्षक बिबट्या असल्याचं त्याच्या नमुन्यांवर आणि ठस्यांवरून स्पष्ट झालं आहे.

# यवतला १० वर्षांनंतर जनावरांचा बाजार सुरु



पुणे । प्रतिनिधी

खुटबाव : दौंड तालुक्यातील यवत येथे दर शुक्रवारी भरणारा जनावरांचा बाजार गेल्या दहा वर्षांपासून बंद होता. तो पुन्हा सुरू व्हावा अशी मागणी जनांवरांचे व्यापारी तसेच शेतकरी करीत होते. त्यानुसार शुक्रवार (दि. ७) पासून जनावरांचा बाजार सुरू झाला. या बाजारात ४० जनावरे विक्रीसाठी आली होती. बाजार सुरू झाल्याने शेतकरी तसेच व्यापारी यांनी समाधान व्यक्त केले.

यवत येथे दर शुक्रवारी आठवडा बाजार भरतो. या बाजारा बरोबर मागील काळात जनावरांचा बाजार भरत होता. हा बाजार जिल्ह्यात प्रसिद्ध होता. मात्र, गेली दहा वर्षांपूर्वी हा बाजार बंद झाला. त्यामुळे येथील शेतकऱ्यांना जनावरे विकण्यासाठी किंवा खरेदी करण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील काष्टी, राशीन, बारामती, चाकण, पुणे येथे जाण्याची वेळ येत होती. त्यामुळे यवत येथे पुन्हा जनावरांचा बाजार सुरू करण्याची मागणी होत होती. त्यानुसार पुन्हा बाजार सुरू झाल्यामुळे शेतकरी आणि व्यापारी यांनी समाधान व्यक्त केले.

यवत येथे शेळी, बकरी यांचा देखील मोठा बाजार भरतो. या दोन्ही बाजारांमुळे आर्थिक उलाढाल वाढण्यास मदत होणार आहे. या वेळी सरपंच समीर दोरगे, ग्रामपंचायत सदस्य सदानंद दोरगे, महादेव दोरगे, पशुवैद्यकीय व दुग्ध व्यवस्थापन सेवा संघाचे पुणे जिल्हाध्यक्ष डॉ. संतोष बडेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे अधिकारी, व्यापारी व शेतकरी उपस्थित होते.

# मुंबई–गोवा महामार्गावर खड्ड्यांमुळे भीषण अपघात; तीन वाहनं एकमेकांवर आदळली, एयर बॅग उघडली पण...

मुंबई-गोवा महामार्गावरील इंदापूर शहराजवळ कोकणाकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या तीन वाहनांचा विचित्र अपघात झाल्याची बातमी समोर येत आहे. महामार्गावरील इंदापूर जवळ असलेल्या कशेने गावाजवळ पडलेल्या खड्ड्यांमुळे हा विचित्र अपघात घडल्याची घटना समोर आली आहे. या खड्ड्यात एका कार चालकाने खड्ड्यांचा अंदाज घेत अचानक ब्रेक मारला, मात्र मागून वेगवान येणारी दोन वाहने या कारवर आदळली आणि हा अपघात घडला. या अपघातात तिन्ही कारचे मोठे नुकसान झाले असून एअर बॅग उघडल्यामुळे या वाहनातील प्रवाशी थोडक्यात बचावले आहेत.

सुदैवाने या अपघातात जीवितहानी टळली आहे. मात्र वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. अपघातानंतर शिंदेच्या सेनेकडून संताप व्यक्त करण्यात आला असून लवकरात लवकर खड्डे बुजवा, अन्यथा कार्यालय फोडू असा इशारा संबंधित विभागाला देण्यात आला आहे.

मुंबईच्या पश्चिम द्रुतगती महामार्गावर भीषण अपघात; एकाचा मृत्यू

दुसरीकडे मुंबईच्या पश्चिम द्रुतगती महामार्गावर मालाडजवळ एक भीषण अपघात झाला असून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. मध्यरात्री दीडच्या सुमारास एका भरधाव डंपरने



बाईकला धडक दिल्याने हा अपघात घडला. बोरिवलीकडून अंधेरीच्या दिशेने येणाऱ्या मार्गावर झालेल्या या अपघातात बाईकवरील एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे.

दरम्यान, जखमी व्यक्तीला तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या अपघातामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावरील वाहतुकीवर परिणाम झाला होता. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास करत आहेत. या घटनेमुळे मुंबईतील रात्रीच्या वेळेतील अवजड वाहनांच्या वेगाचा आणि रस्त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

दिल्लीहून चेन्नईकडे निघालेला कंटेनरचा अपघात; ४० फ्रीजसह कंटेनर जळून खाक

तर हिंगोली (कळपसेश्रळ) जिल्ह्यातील कळमनुरी–नांदेड महामार्गावर (घरश्ररापींळ–छरपवशव कळसहुरू) दातीपाटीजवळ एका कंटेनरला भीषण आग लागली. दिल्लीहून (ऊशश्रहळ) चेन्नईच्या (उहशपपरळ) दिशेने ४० फ्रीज घेऊन निघालेल्या या कंटेनरच्या केबिनमधून अचानक धूर येऊ लागल्याचे चालकाच्या लक्षात आले. प्रसंगावधान राखत चालकाने तात्काळ कंटेनरमधून बाहेर उडी मारल्याने त्याचा जीव वाचला. या आगीच्या घटनेत संपूर्ण कंटेनर आणि त्यातील ४० फ्रीज जळून पूर्णपणे खाक झाले आहेत. या घटनेमुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, या दुर्घटनेत कंटेनरचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

# शेताच्या वादातून हल्ला: दोघे जखमी, लोखंडी गज व विटेचा वापर; शिरूर तालुक्यातील घटना

**शिरूर : टाकळी हाजी (ता. शिरूर) येथील साबळेवाडी मध्ये जमीन मोजणीच्या वादातून झालेल्या हल्ल्यात वडील–मुलासह दोघेजण गंभीर जखमी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी अनिल पोपट भाईक (रा. साबळेवाडी, टाकळी हाजी) याच्याविरुद्ध शिरूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



याबाबत शिरुर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हरीदास आनंता भाईक (वय ५६वर्ष ) रा. साबळेवाडी, टाकळी हाजी) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ते त्यांच्या घरासमोर बसले असताना आरोपी अनिल भाईक तेथे आला. फिर्यादी यांनी त्यांच्या गट क्रमांक २६९ मधील सर्व्हे नंबरची खूण दाखवून, तू हरी भाईक यांच्याकडून जमीन विकत घेतली आहेस, त्यांच्याकडून मोजणी करून घे, असे समजावून सांगत असतानाच आरोपी संतापला.

या संतापातून आरोपी अनिल भाईक यांनी त्यांच्या हातातील लोखंडी गजाने हरीदास भाईक यांच्या डोक्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. गज डोक्यावरून सरकल्याने फिर्यादींच्या डाव्या खांद्यावर जोराचा वार बसला व खांद्याचे हाड फ्रॅक्चर होऊन गंभीर दुखापत झाली.

जखमीला उपचारासाठी कारमध्ये बसवून घेऊन जात असतानाही आरोपी रस्त्यात अडवा उभा राहिला आणि जखमींना रुग्णालयात जाऊ न देण्यासाठी अडथळा आणला. त्यावेळी त्याने शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीने नमूद केले आहे. आरोपीने हरीदास भाईक यांचे वडील आनंता हरी भाईक यांच्यावरही विट फेकून मारली, ती विट त्यांच्या उजव्या गुडघ्यावर लागून दुखापत झाली. त्यांनाही आरोपीने शिवीगाळ व धमक्या दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

या हल्ल्यामुळे फिर्यादीच्या कुटुंबास जीविताचा धोका निर्माण झाला असल्याची नोंद करण्यात आली आहे. या संपूर्ण प्रकरणी शिरूर पोलीस स्टेशन येथे दि. ०८ नोव्हेंबर रोजी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार अरुण उबाळे हे करीत आहेत. ग्रामीण भागातील वारंवार जमीन वादातून अशा घटना निर्माण होत आहे. झालेल्या या गंभीर हल्ल्याने स्थानिकांमध्येही चिंतेचे वातावरण आहे.

# पीसीसीओईआरच्या विद्यार्थ्यांचा अनाथ आश्रमात दीपोत्सव !

पुणे । प्रतिनिधी

महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव, संवेदनशीलता आणि मानवतावादी दृष्टिकोन निर्माण व्हावा यासाठी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या सर्व शैक्षणिक शाखांमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्या अंतर्गत रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) ॲप्लाइड सायन्स अँड ह्युमॅनिटीज विभाग तसेच एफइएसए आणि लाइफ स्किल्स सेल विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी पीसीसीओईआर डॉ. हरीश तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली ताथवडे मधील निधी प्रेरणा भवन अनाथ आश्रम येथे दीपोत्सव साजरा केला.



यावेळी विभागप्रमुख प्रा. शीतल पाटील, कार्यक्रम समन्वयक प्रा. प्रिया ओघे, प्रा. निलेश ठुबे, विद्यार्थी प्रतिनिधी पार्थ निकुंभ, अर्थव देशमुख, राजवर्धन शितोळे, वेदका पाटील, सौम्या बुकने, जिया आवटे, प्रणिता माणे, सनाथकुमार पोल, श्लोक पाटील, पुर्वेश चाटे आदी विद्यार्थी उपस्थित होते. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या कल्पकतेचा आणि कलात्मकतेचा वापर करून आकाश कंदिल व हाताने रंगवलेले दिवे तयार केले होते. या वस्तूंची विक्री त्यांनी दीपोत्सव या उपक्रमातून केली होती. यामधून जमा झालेला निधी प्रेरणा भवन अनाथ आश्रम, ताथवडे आणि पिंपरी चिंचवड येथील वृध्दांना देणगी स्वरूपात देण्यात आला. तसेच महाविद्यालयाच्या वतीने धान्य, किराणा साहित्य, मिठाई आणि इतर आवश्यक वस्तू आश्रमात देण्यात आल्या. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी आश्रमातील अनाथ मुलांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या तसेच पीसीसीओईआर च्या या उपक्रमाचे कौतुक केले.

# अरुण पवार यांची पिंपळे गुरव ते वायसीएम रुग्णालय मार्गावर बसथांब्याची पीएमपीएमएल'कडे मागणी

पुणे । प्रतिनिधी

पिंपळे गुरव ते वायसीएम रुग्णालय, डी. वाय. पाटील कॉलेज, नेहरूनगर व मासुळकर कॉलनी या वर्दळीच्या मार्गांवर प्रवाशांच्या सोयीसाठी नवीन बस थांबे समाविष्ट करावेत, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते अरुण पवार यांनी पुणे महानगर परिवहन महामंडळाकडे निवेदनाद्वारे केली आहे.



या संदर्भा अरुण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाडा जनविकास संघाचे सदस्य श्रीकृष्ण जाधवर व मालोजी भालके यांनी पीएमपीएमएलचे व्यवस्थापकीय संचालक पंकज देवरे यांना निवेदन दिले. त्यांनी पीएमपीएमएलचे अधिकारी सतीश गव्हाने यांना याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना केल्या. अरुण पवार यांनी निवेदनात म्हटले आहे, की पिंपळे गुरव परिसरातील नागरिकांना वैद्यकीय उपचारासाठी, तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी वायसीएम रुग्णालय, डी. वाय. पाटील कॉलेज, नेहरूनगर व मासुळकर कॉलनी याठिकाणी जावे लागते. मात्र, नियमित बस नसल्याने त्यांची मोठी गैरसोय होते. या मार्गांवर बस सुरू झाल्यास नागरिक व विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळेल.दरम्यान, मागणीची दखल घेऊन या मार्गांवर नागरिकांची सोय व्हावी यासाठी हे काम तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन पीएमपीएमएल प्रशासनाने दिले आहे. प्रशासनाकडून मिळालेल्या या सकारात्मक प्रतिसादामुळे परिसरातील प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.



# पानशेतच्या ओसाडे येथे गावठी दारुची हातभट्टी उद्ध्वस्त

वेल्हे: पानशेत रस्त्यावरील ओसाडे (ता. राजगड) येथील खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रालगत सुरू असलेला बेकायदा गावठी दारू तयार करणारा मोठा हातभट्टीचा अड्डा वेल्हे पोलिसांनी धाड टाकून उध्वस्त केला आहे. या कारवाईत बच्चन मेरु नानवत (वय ३५, रा. ओसाडे) यास महाराष्ट्र दारुबंदी कायद्याखाली अटक करण्यात आली आहे.

वेल्हे पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक किशोर शेवते यांच्या नेतृत्वाखालील पथकाने काल, शुक्रवारी (दि. ७) सायंकाळी पाचच्या सुमारास मुनवॉक हॉटेलजवळ, पाणलोट क्षेत्राच्या दलदलीतील झाडाझुडुपांत ही धाड टाकली. यावेळी दहा ते पंधरा फूट खोल खड्ड्यात ठेवलेले दोन बॅलर व एका प्लॅस्टिकच्या टाकीत मिळून तब्बल दोनशे लिटर गावठी दारू तसेच नवसागर, गूळ, तुरटी आणि प्लॅस्टिकच्या पिशव्यांचा मोठा साठा आढळला.जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत सुमारे २४ हजार रुपये आहे. यापूर्वीही वेल्हे पोलिसांनी या ठिकाणी अनेकदा कारवाई केली असून, धरणात पोहत पलायन करणाऱ्या हातभट्टी चालकाला पोलिसांनी धरणातच जेरबंद केल्याची घटनाही घडली होती. वारंवार कारवाई करूनही राजरोसपणे हातभट्टी सुरू असल्याचे निष्पन्न झाल्याने, सुधारित कायद्यानुसार संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे सहायक पोलिस निरीक्षक किशोर शेवते यांनी सांगितले.

# राष्ट्रवादीचा शिवसेनेला धक्का दोन माजी नगरसेवकांचा प्रवेश

पिंपरी - सध्या शहरात महापालिका निवडणुकीचे पडघम वाजत आहेत. निवडणूक स्वबळावर लढविण्यासाठी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. निवडणुकीपूर्वी राष्ट्रवादी दोन्ही शिवसेनेला धक्का दिला आहे. शिवसेनेच्या दोन माजी नगरसेवकांनी अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला आहे. उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी माजी नगरसेवक अनंत कोऱ्हाळे आणि जितेंद्र ननावरे यांना पक्षात प्रवेश दिला आहे.



यावेळी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष योगेश बहल, महिला शहराध्यक्षा प्रा. कविता आल्हाट, वरिष्ठ नेते आणि माजी नगरसेवक नाना काटे व अजित गव्हाणे उपस्थित होते. माजी नगरसेवक अनंत कोऱ्हाळे हे चिंचवडमध्ये सक्रिय असून चिंचवड विधानसभा प्रमुखपदाची जबाबदारी देखील त्यांनी सांभाळली आहे. तर जितेंद्र ननावरे हे पिंपरीत सक्रिय असून त्यांनी युवासेनेची देखील जबाबदारी सांभाळली आहे. या दोन माजी नगरसेवकांचे आपपल्या प्रभागात वर्चस्व आणि चांगला जनसंपर्क आहे. आगामी निवडणुकीच्या दृष्टीने हा पक्षप्रवेश खूपच महत्त्वाचा मानला जात आहे. महापालिका निवडणूक स्वबळावर लढविण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी आग्रही आहेत. सर्व प्रभागात चांगले उमेदवार मिळावे यासाठी प्रयत्न सुरु असल्याचे दिसून येत आहे.

राष्ट्रवादीत उत्साहाचे वातावरण

विधानसभा निवडणुकीपूर्वी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत मोठी पडझड झाली होती. त्यानंतर योगेश बहल यांच्या हातात शहराध्यक्ष पदाची सूत्रे देण्यात आली. शहराध्यक्ष बहल आणि पक्षाचे वरिष्ठ नेते नाना काटे यांनी पक्ष सोडून गेलेल्या सर्व माजी नगरसेवकांना पुन्हा पक्षात आणले. आता माजी शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासोबत मिळून राष्ट्रवादीचे स्थानिक पदाधिकारी इतर पक्षातही सुरुंग लावत आहेत. सर्वच प्रभागात तुल्यबळ उमेदवारांसाठी प्रयत्न सुरू आहेत.

# २३० कोटी शुभेच्छा..! मुरलीधर मोहोळांना वाढदिवसानिमित्त धंगेकरांचा खोचक टोला

**पुणे । प्रतिनिधी**

**मागील महिन्यात पुण्याच्या मॉडेल कॉलनीतील जैन बोर्डिंग हाउसच्या जमीनीचा विक्री व्यवहार चांगलाच चर्चेत होता. केंद्रीय राज्यमंत्री तथा भारतीय जनता पार्टीचे खासदार मुरलीधर मोहोळ यांच्याशी संबंधित बांधकाम व्यावसायिकाने या जमिनीचा खरेदी व्यवहार केला होता. याप्रकरणी जैन समाज बांधवांनी आक्रमक पवित्रा घेतला होता.**

यावरून जैन समाज बांधवानी मुरलीधर मोहोळ यांना धारेवर धरले होते. याशिवाय शिवसेनेचे (शिंदे) नेते तथा माजी आमदार रवींद्र धंगेकर यांनी हे प्रकरण लावून धरलं होतं. धंगेकर यांनी मुरलीधर मोहोळ यांच्यावर सातत्याने वेगवेगळे आरोप केले. अखेर धर्मादाय आयुक्तांनी हा व्यवहार रद्द करण्याचे आदेश दिले.

दरम्यान, व्यवहार रद्द झाल्यानंतर हे प्रकरण शांत झालं. मात्र, रवींद्र धंगेकर यांनी या घटनेचा उल्लेख करत एक्सवर एक पोस्ट केली आहे. मुरलीधर मोहोळ यांचा आज ५१ वा वाढदिवस असल्याने रवींद्र धंगेकर यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. मात्र, या शुभेच्छा देताना मोहोळ यांना चिमटा काढला आहे. रवींद्र धंगेकर यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये लिहिले की हॅपी बर्थडे बरं का! वाढदिवसाच्या २३० कोटी शुभेच्छा..! जय जिनेंद्र.दरम्यान, जैन बोर्डिंग हाऊसच्या जमिनीचा व्यवहार २३० कोटी रुपयांमध्ये होणार होता. त्याचाच उल्लेख करत धंगेकरांनी २३० कोटी शुभेच्छा म्हणत टोला लगावला आहे.